रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १६९
www.ramprahar.com
शुकवार, ५ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘हिजबुल’च्या कमांडरला दिल्ली पोलिसांकडून बेड्या



**नवी दिल्ली :** येथील पोलिसांच्या विशेष पथकाने हिजबुल मुजाहिदीनच्या कमांडर जावेद अहमद मट्टू याला गुरुवारी (दि. ४) बेड्या ठोकल्या आहेत. याच्यावर सरकारने १० लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. तो जम्मू काश्मीरमधील अनेक अतिरेकी कारवायांमध्ये सहभागी होता. जावेद मट्टू यापूर्वी अनेकदा पाकिस्तानमध्येदेखील जाऊन आला आहे. तो जम्मू काश्मीरमधल्या सोपोरमधला रहिवासी आहे. पोलिसांनी जावेदला पकडल्यानंतर त्याच्याकडील पिस्तूल, गोळ्यांचे मॅगजिन, चोरी केलेली गाडी जप्त केली आहे. जावेद मट्टू हा पाच ग्रेनेड हल्ले आणि पाच पोलिसांच्या हत्येत सहभागी होता. काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी करवाया केल्यानंतर मट्टू भूमीगत झाला होता.

अंतरंग
पनवेलच्या रोहिदास वाड्यात तीन कोटींची विकासकामे/३
‘दिबां’च्या जयंती दिनी होणार रोजगार मेळावा/६
भारताचा दक्षिण आफ्रिकेवर ऐतिहासिक विजय/८

# रायगडात आज ‘शासन आपल्या दारी’

## लोणेरे येथे कार्यक्रम; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची लाभणार उपस्थिती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या भव्य पटांगणावर शुक्रवारी (दि. ५) शासन आपल्या दारी हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, तसेच उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, रविशेठ पाटील, भरत गोगावले, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, जयंत पाटील, अनिकेत तटकरे, कुलगुरु डॉ. बाबासाहेब तंत्रशास्त्र




विद्यापीठ, लोणेरे प्रा. डॉ. कारभारी काळे, विभागीय आयुक्त कोकण विभाग डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहे.

या मैदानावर सुमारे १२ एकर जमिनीवर सभामंडप, २५ लाभार्थ्यांना बसण्यासाठी व खाण्यासाठी तसेच पार्किंगची व्यवस्था केली असून ४० एकरवर भव्य तीन मंडप उभारले आहेत. माणगाव तालुक्यातून २०० एसटी बसमधून १० हजार लाभार्थी व खासगी वेगवेगळ्या वाहनातून पाच हजार लाभार्थी असे १५ हजार लाभार्थी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमस्थळी जिल्हा सामान्य रुग्णालय, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रोगनिदान व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शासकीय विविध विभागांचे माहितीपूर्ण स्टॉल लावण्यात येणार आहे. याठिकाणी नागरीक व लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

### नोव्हेंबर २००५नंतरच्या शासकीय कर्मचाऱ्यांना दिलासा

## जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय खुला

**मुंबई : प्रतिनिधी**

शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरातींनुसार जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय गुरुवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात येत आहे. संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा हा पर्याय शासन



निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहिल. जे अधिकारी, कर्मचारी या सहा महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहिल.

जुनी निवृत्तीवेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करावा. कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्यास पात्र झाल्यास तशा पद्धतीचे कार्यालयीन ज्ञापन संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने पर्याय प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत द्यावे, तसेच त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे खाते तत्काळ बंद केले जातील.

जे अधिकारी व कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्यनिर्वाह निधीचे खाते उघडण्यात येईल व त्या खात्यात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील त्यांच्या हिश्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात येईल. जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम हा पर्याय स्वीकारणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्यात येईल.

## राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची नियुक्ती



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संभाव्य पोलीस महासंचालकपदाच्या सेवाज्येष्ठतेच्या यादीत रश्मी शुक्ला यांचे नाव अग्रस्थानी होते. शुक्ला यांना मुंबई पोलीस आयुक्त करणार असल्याची चर्चा होती. त्यांची गुरुवारी (दि. ४) महाराष्ट्र पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली. रश्मी शुक्ला या राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक असणार आहेत.

राजकीय नेत्यांच्या फोन टॅपिंग प्रकरणात त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने २९ डिसेंबर रोजी बैठक घेतली. या वेळी महासंचालकपदासाठी तीन अधिकाऱ्यांच्या नावांची यादी त्यांनी पाठवली.

यामध्ये सर्वात आधी नाव रश्मी शुक्ला यांचे नाव होते. त्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना निर्णय घ्यायचा होता. अखेर गुरुवारी शासनाने शुक्ला यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केला. रश्मी शुक्ला या राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक असणार आहेत.

## ‘पेण अर्बन’च्या ठेवीदारांचा प्रश्न मार्गी लावणार : मंत्री दिलीप वळसे -पाटील

मंत्रालयात संघर्ष समितीच्या सदस्यांची बैठक



**कर्जत : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना बँकेच्या मिळकतीचा लिलाव करून पाच लाखांचे विमा कवच द्यावे या मागणीसंदर्भात सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या दालनात बुधवारी (दि. ३) बैठक घेण्यात आली. पेण अर्बन बँक ठेवीदार खातेदार संघर्ष समितीचे सदस्यांची मागणी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी ऐकून संबंधित अधिकाऱ्यांना शासन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या, तसेच स्वतः जातीने लक्ष देऊन प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन दिले. **(पान २ वर..)**

## काळुंद्रे गाव कॉलनी म्हणून उदयास येईल -परेश ठाकूर



■ विविध विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काळुंद्रे गावात होत असलेल्या विकासकामांमुळे लवकरच काळुंद्रे हे गाव न राहता कॉलनी म्हणून उदयास येईल, असा विश्वास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ४) विकासकामांच्या भूमिपूजनावेळी व्यक्त केला.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या **(पान २ वर..)**



# देशाच्या कृषी क्षेत्राच्या विकासात शेतकरी महिलांचे अमूल्य योगदान

## ■ मुख्यमंत्र्यांचा लेख जागतिक आर्थिक परिषदेकडून प्रकाशित

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतात राबणाऱ्या आपल्या महिला भगिनी राज्य आणि पर्यायाने देशाच्या कृषी क्षेत्राच्या विकासात अमूल्य असे योगदान देत आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी भगिनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात अग्रेसर आहेत. महिलांच्या याच योगदानाबाबत आणि महाराष्ट्रातील 'माविम'च्या कामाची माहिती देणारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा लेख जागतिक आर्थिक परिषद-वर्ल्ड इकॉनॉमी फोरमने प्रकाशित केला आहे.



जागतिक आर्थिक परिषदेने 'माविम'च्या वाटचालीची दखल घेत, परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांच्या लेखाला स्थान देणे ही बाब महत्वपूर्ण ठरली आहे.

महाराष्ट्र शासन शेतकरी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देत आहे. 'एआय-फॉर-एआय'म्हणजे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर ॲग्रीकल्चरल इनोव्हेशन या जागतिक आर्थिक परिषदेच्या धोरणाबरहुकूम पावले टाकत आहे. शेती, शेतमाल आणि बाजारपेठेशी संबंधित मूल्य साखळीत या महिलांचे स्थान बळकट व्हावे, यासाठी माविम प्रयत्नशील असल्याची माहिती देण्यात आली आहे. 'माविम' सुमारे दीड लाख महिला बचतगटांच्या माध्यमातून असे ३६१ संघ स्थापन करून त्यांना शेतीमाल उत्पादन आणि बाजारपेठेशी जोडण्यात येणार आहेत.

माविम जागतिक आर्थिक परिषदेच्या (वर्ल्ड इकॉनॉमी फोरम)च्या मदतीने या शेतकरी महिलांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणार आहे. फार्म-टू-मार्केट या व्यासपीठाद्वारे मूल्य साखळीमध्ये महत्वपूर्ण असे परिवर्तन आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. लवकरच 'माविम' ॲग्रिटेक क्षेत्रातील डीजिटल ग्रीकल्चरल फ्रेमवर्क प्रत्यक्षात आणणार आहे. यामध्ये बारा खासगी कंपन्याही सहभागी होणार आहेत, याबाबतही मुख्यमंत्र्यांनी या लेखात सुतोवाच केले आहे. महाराष्ट्राचे माविमच्या माध्यमातून सुरू टाकलेले हे पाऊल अन्य राज्यांसाठी दीपस्तंभासारखे राहील. त्यातून शेतकरी महिला भगिनींची प्रगती, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठीच्या प्रयत्नामध्ये भर पडणार आहे. या अनुषंगाने या लेखात माहिती देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील महिलांना जमीन, तंत्रज्ञान आणि वित्तीय सेवा उपलब्ध करून दिल्यास जगभरातील कृषी उत्पन्नात आणि अन्न सुरक्षा यामध्ये २० ते ३० टक्क्यांनी वाढ होणार आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रातील महिला भगिनींच्या कृषी क्षेत्रातील योगदानाबाबत भाष्य केले आहे.

# 'युनिकेम'विरोधातील आंदोलन तूर्तास स्थगित -अमित घाग

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

भाजपने स्थानिक भूमिपुत्रांसाठी युनीकेम कंपनी गेट बंद आंदोलन पुकारले होते. कंपनी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने गुरुवारी (दि. ४) भाजपचा युनीकेम गेट बंद आंदोलन तुर्तास स्थगित झाल्याचे भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी धाटाव येथील आरआयआरसी येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

युनिकेम कंपनी व्यवस्थापन विरोधात गेट बंद आंदोलन उभारले होते. बुधवारी रात्री उशीरा कंपनी व्यवस्थापनाने मंत्री रवींद्र चव्हाण, ना. चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्याशी चर्चा करून लेखी पत्र देऊन भाजपच्या स्थानिक भूमिपुत्रांच्या मागण्या आहेत त्या आम्ही एक महिन्याच्या आत मान्य करण्याचा प्रयत्न करू, असे लेखी पत्राद्वारे कळविल्यानंतर युनिकेम कंपनीचे गेट बंद आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### कंपनीकडून लेखी आश्वासन

स्थानिक भूमिपुत्रांच्या मागण्या आहेत त्या आम्ही एक महिन्याच्या आत मान्य करण्याचा प्रयत्न करू, असे युनिकेम कंपनी व्यवस्थापनाकडून लेखी आश्वासन देण्यात आले. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

या वेळी भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, सरचिटणीस आनंद लाड, सरचिटणीस कृष्णा बामणे, तालुका उपाध्यक्ष रवींद्र तारू, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, जिल्हा सरचिटणीस युवा मोर्चा रितेश मुंडे, कामगार आघाडी नेते विलास डाके, रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्ष महेश ठाकूर, अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष निमिश वाघमारे, जिल्हा युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे, निलेश धुमाळ, अनिल घरजाळे, महिला मोर्चा जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, रिया कासार यासह मोठ्या संख्येने युवक व पदाधिकारी उपस्थित होते.



# शासन आपल्या दारीसाठी एसटीच्या ५०० बसेस

**अलिबाग : प्रतिनिधी**

लोणेरे इथे शुक्रवारी (दि. ५) होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमासाठी लाभार्थी आणि इतर आवश्यक व्यक्तींची ने-आण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात बसेस उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यात एसटी महामंडळाकडून ५०० बसेस पुरवण्यात येत आहेत तर ३७३ खासगी बसेसही उपलब्ध करण्यात आल्या आहेत.




लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या परिसरात हा कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. लाभार्थी आणि नागरिक मिळून साधारण ७० ते ७५ हजार लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतील असे नियोजन करण्यात आले आहे. या सर्वांची येण्या जाण्याची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. त्या एस टी बरोबरच खासगी बसेस अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

एसटी महामंडळाने रायगड विभागातील आठ आगारांमधून २०० बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. तर लगतच्या जिल्ह्यातून पुणे ७०, मुंबई ३०, ठाणे ५०, सातारा ५० आणि रत्नागिरी १०० अशा ३०० बसेस सज्ज ठेवल्या आहेत. यामुळे एस टीच्या नियमित फेऱ्या वर परिणाम होणार आहे. हे लक्षात घेवून लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या फेऱ्या कमी करण्यात आले असून दोन दिवसांसाठी त्यांचे आरक्षणदेखील थांबवण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील फेऱ्यांचे नियोजन करताना शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जात असल्याचे रायगड परिवहन विभागाचे जिल्हा वाहतूक नियंत्रक प्रशांत खरे यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी खासगी बसेस मोठ्या संख्येने अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. यात विविध कंपन्यांच्या कामगार, कर्मचारी यांची वाहतूक करणाऱ्या बसेस लाभार्थी वाहतूकीसाठी वापरल्या जाणार आहेत. या खासगी बसेसची संख्या ३७३ इतकी आहे.

# शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूसाठी पथकर निश्चित

**मुंबई : प्रतिनिधी**

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूसाठी पथकर निश्चित करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे पथकर आकारणीच्या नियमाप्रमाणे वाहनांसाठी येणाऱ्या दरापेक्षा ५० टक्के कमी दराने पथकर आकारण्याचा निर्णय गुरुवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.



कारसाठी ५०० ऐवजी २५० रुपये आकारण्यात येतील. वारंवार प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांकरिता परतीचा पास एकेरी पथकराच्या दीडपट, दैनिक पास एकेरी पथकराच्या अडीचपट आणि मासिक पास एकेरी पथकराच्या पन्नास पट अशी सवलत देण्यात आलेली आहे.

अटल सेतू उभारणीकरिता एकूण २१,२०० कोटी रुपये इतका खर्च आला असून त्या पैकी १५,१०० कोटी रुपये इतके कर्ज घेण्यात आलेले आहे. या प्रकल्पामुळे पनवेलपासून दक्षिण मुंबईच्या दिशेने ये-जा करणाऱ्या वाहनांचे सुमारे १५ कि.मी. इतके अंतर कमी होईल. त्याचबरोबर गर्दीच्या वेळी सुमारे दीड ते दोन तासांच्या वेळेची बचत होईल. परिणामी इंधनावरील खर्चात वाहनाकरिता किमान ५०० रुपये इतकी बचत होईल.

अटल सेतू या सागरी मार्गाच्या दोन्ही बाजूने शिवडी येथील फ्लेमिंगो पक्ष्यांच्या संरक्षणाकरिता पहिल्या ० ते ४ किलोमीटर दरम्यान दोन्ही बाजूने ध्वनी संरक्षक व अतिसंवेदनशील अशा भाभा अणु संशोधन केंद्र व माहूल येथील तेल शुद्धीकरण केंद्र या ४ ते १० किलोमीटर अंतरामध्ये दृश्य अडथळे बसविण्यात आलेले आहे.

# तुपगावात आव्हाडांच्या पुतळ्याचे दहन



**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रवादीच्या कार्यक्रमामध्ये आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू रामचंद्राच्या बाबतीमध्ये जे वादग्रस्त वक्तव्य केले. त्याचा निषेध करण्यासाठी तुपगाव ग्रामस्थांच्यावतीने जोडे-मारो अभियान करून जितेंद्र आव्हाडांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. चौक तुपगाव येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त करून आव्हाड यांची अंत्ययात्रा काढली.

शिर्डी येथे प्रभू श्री राम या हिंदू धर्मियांच्या दैवताला मांसाहारी असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केल्याने संपूर्ण देशात त्यांच्याविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. चौक तुपगाव येथील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि हिंदू धर्मियांच्या संघटना यांनी वाशिवली-चौक रस्त्यावर जितेंद्र आव्हाड याच्या पुतळ्याची अंत्ययात्रा काढून पुतळा जाळण्यात आला.

या वेळी तुपगाव गावातील तरुण सर्वपक्षीय कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. जितेंद्र आव्हाड मुर्दाबाद, मुर्दाबाद अशा घोषणांनी परिसर दणानून निघाला. या वेळी नागरिकांनी जय श्रीराम जय श्रीरामच्या घोषणा दिल्या.

# गरजूंना शिवण मशीन वाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गरिबीला पराभूत करून आत्मनिर्भरता वाढविण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या झिराड कृषी व्यवसायिक शाखेने आज एक आधारभूत उपक्रम राबविला. सीएसआर कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत बँकेने गरजू महिलांना आधार देण्यासाठी २५ शिवण मशीन वाटप केले.

या कार्यक्रमासाठी सनातन मिश्रा, राघवेंद्र कुमार, भरत आडसुले, देशपांडे सीएम, अजित खराडे, प्रकाश तांबे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सनातन मिश्रा यांनी सीएसआर उपक्रमांमध्ये गरिबी आणि बेरोजगारीचा सामना करणाऱ्यांना मदत करणे हे बँकेचे प्राथमिक ध्येय असल्याचे नमूद केले. राघवेंद्र कुमार यांनी महिला सक्षमीकरण हा देश विकासाचा पाया असल्याचे नमूद केले. प्रकाश तांबे यांनी या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक प्रशासन आणि सर्व सहयोगींचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक झिराड सीआरपी सारिका राऊत यांनी मांडून महिलांना मार्गदर्शन केले. या सोहळात झिराड आणि परिसरातील मोठ्या प्रमाणावर महिला व सिआरपी आस्मा शेख व मिनल पेटारे उपस्थित होत्या.



# कांबे गावात काँक्रीटीकरण रस्त्याचा शुभारंभ



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभा आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून २५ लक्ष विकासकामे कांबे येथील नवीन वसाहत जोड रस्ता काँक्रिटीकरण करण्याचा शुभारंभ गुरुवारी (दि. ४) करण्यात आला.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा झाला. या वेळी ह.भ.प. कान्होंबा महाराज कुरंगळे, भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, प्रवीण काळबागे, तालुका सरचिटणीस प्रवीण जांभळे, चांभार्ली ग्रामपंचायचे सरपंच प्रतीप पाटील, उपसरपंच समीर पाटील, विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, ह.भ.प. बाळाराम महाराज कुरंगळे, कैलास म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य सचिन कुरंगळे, सदस्या बेबी म्हात्रे, सदस्या अमृता कुरंगळे, शरद कुरंगळे, विनायक डवळे, निखिल डवळे, संतोष कुरंगळे, सुनील कुरंगळे, जयराम गोंधळी, रामचंद्र कुरंगळे, दिलीप कुरंगळे, धनाजी कुरंगळे, सचिन कुरंगळे, ठेकेदार दर्शन पोळेकर उपस्थित होते. सदरचे काम सचित शरद कुरंगळे यांच्या प्रयत्नांनी होत आहे. या वेळी कांबे येथील ग्रामस्थ व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

## पेण अर्बनच्या ठेवीदारांचा प्रश्न मार्गी लावणार-मंत्री दिलीप वळसे पाटील

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने ही बैठक झाली. राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी अशा बैठकीची मागणी तटकरे यांच्याकडे केली होती. पेण अर्बन बँक बंद होऊन जवळपास १३ वर्षे होऊनदेखील तीन लाखांहून अधिक ठेवीदारांना आजतागायत न्याय मिळाला नाही. १,५१० ठेवीदारांची रक्कम १६८ कोटी रुपये असून त्यांनाही पाच लाखांपर्यंत मिळून उर्वरित रक्कम बँकेच्या मिळकतीच्या विक्रीतून देता येईल, अशी मागणी पेण अर्बन बँक ठेवीदार खातेदार संघर्ष समिती यांनी सुधाकर घारे यांच्याकडे करण्यात आली. सुधाकर घारे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे संबंधित मागणीसाठी राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची विनंती केली होती. त्यानुसार खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या दालनामध्ये संघर्ष समितीच्या सदस्यांसह बैठक झाली.

खासदार सुनील तटकरे, सुधाकर घारे, पेण बँक संघर्ष समितीचे दोन सदस्य, तसेच सहकार विभागाचे अप्पर सचिव, सहकार आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी आदींसह सहकार विभागामधील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## काळुंद्रे कॉलनी म्हणून उदयास येईल -परेश ठाकूर

नेतृत्वाखाली अनेक विकासकामे मार्गी लागून नागरिकांना सुविधा उपलब्ध होत आहेत. काळुंद्रे गावातील वाढते नागरीकरण लक्षात घेता महापालिकेमार्फत नवीन पाण्याची टाकी आणि अंतर्गत नळवाहिनी जोडण्याचे काम एक कोटी ५० लाख निधी खर्चून करण्यात येणार आहे.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, शहर उपाध्यक्ष प्रभाकर बहिरा, काळुंद्रे वॉर्ड अध्यक्ष रघुनाथ बहिरा, शंकर म्हात्रे, स्नेहलता म्हात्रे, गणेश घरत, सचिन चिखलेकर, बाळाराम चिखलेकर, मधुकर घरत, आबा घरत, केशव म्हसकर, छगन चिखलेकर, रामा खुटाळे, बादल म्हात्रे, नारायण गायकवाड, मनिष घरत, परेश चिखलेकर, मिथुन चिखलेकर, अनंत घरत आदी उपस्थित होते.

# चौक येथे अक्षता कलशचे स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

प्रभू श्री राम यांच्या अयोध्या येथील मंदिर उद्‌घाटन आणि प्रभू श्री राम यांच्या प्राणप्रतिष्ठा अक्षता कलशाचे स्वागत चौक गावांतील व परिसरातील ग्रामस्थ, महिला, युवक यांनी भव्य स्वागत केले.

प्रभू श्री राम यांच्या मंगल अक्षता कलश चौक येथे आल्यावर चौक बाजारपेठ व परिसरातील मोठी मिरवणूक यात्रा काढण्यात आली. या वेळी प्रभू श्री राम यांचा जयघोष करण्यात येत होता. विशेष म्हणजे यावेळी वयोरुद्ध महिला, तरुणी, ज्येष्ठ नागरिक, युवा, वारकरी संप्रदाय व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित राहून संपुर्ण बाजारपेठ मधून पूजन, पंचारती व फुलांचा वर्षाव करण्यात येत होता.

या वेळी माजी आमदार देवेंद्र साटम, उद्योगपती विनोद भोईर, उद्योगपती, अभिजित देशमुख, अवधूत करमरकर, गणेश कदम, माजी सरपंच सारिका चौधरी, मंडळाच्या अध्यक्षा पुनम प्रभाकर चोगले, प्रसाद देसाई, निखिल मालुसरे, पंकज शहा, प्रकाश पवार यांच्यासह अनेक मान्यवर, भाविक उपस्थित होते.



# संजय सेठी यांना जेएनपीएतर्फे सेवानिरोप

**उरण : वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणामधील (जनेपप्रा) अत्यंत यशस्वी आणि परिवर्तनीय कार्यकाळानंतर संजय सेठी यांनी अधिकृतपणे त्यांच्या प्रतिनियुक्तीचा समारोप केला. त्यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्यासाठी निरोप समारोह आयोजित करण्यात आला होता.



सेठी यांच्या अनुकरणीय सेवेचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमाला सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री आणि सागरी समुदायातील इतर विविध भागधारक उपस्थित होते. सेठी यांचा निरोप घेताच, नेतृत्वाची धुरा उन्मेष शरद वाघ यांच्याकडे सोपवण्यात आली आहे, जे आता प्रभारी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारत आहेत. वाघ यांच्याकडे असणारा सागरी उद्योगातील दांडगा अनुभव आणि प्रभावी कार्यपद्धती यांच्या बळावर त्यांनी, त्यांच्या पूर्ववर्तींनी रचलेल्या पायावर कार्य उभारण्याचे वचन दिले आहे.

## निवडक

### दुचाकीच्या अपघातात तरुणीचा मृत्यू

**पनवेल :** दुचाकीच्या पाठीमागे बसलेली तरुणी खाली पडून तिचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील तळोजा परिसरात घडली आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणीचे नाव शैफिता मुस्ताक खान (वय २३) असे असून ती कल्याण पलावा येथील मारवेला सोसायटीत कुटुंबासह राहात होती. शैफिता ही चेंबुर येथील आयटी कंपनीत काम करत होती. रात्रीच्या सुमारास शैफिता ही मित्र सुफियान सलीम कुरेशी (वय २८) याच्यासोबत त्याच्या मोटरसायकलवरून घरी परतत होती. या वेळी नावडे फाटा शैफिताचा तोल गेल्याने ती दुचाकीवरून खाली पडली. त्यामुळे तिच्या डोक्याला दुखापत होऊन ती जबर जखमी झाल्याने सुफियान याने तिला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयामध्ये दाखल केले, मात्र तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

### मोठे भिंगार गावात एकाची आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील मोठे भिंगार गावात घडली आहे. सौरभ पवार मृत तरुणाचे नाव आहे. त्याने आत्महत्या का केली याचे कारण समजू शकले नाही. या प्रकरणी तालुका पोलीस तपास करत आहेत.

# पनवेलच्या रोहिदास वाड्यात तीन कोटींची विकासकामे

## भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोहिदास वाड्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे तीन कोटी रुपयांची विकासाची कामे होणार आहे. पनवेल महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या या कामांचे भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ४) भूमिपूजन झाले.

भारतीय जनता पक्ष अणि विकास हे एक समीकरण बनले आहे. त्यानुसार पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासाची कामे सुरू आहेत.

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून रोहिदास वाड्यात अंतर्गत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे, रस्ता काँक्रीटीकरण करणे, पाण्याची पाईपलाईन टाकणे, अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम तीन कोटी २२ लाख ३० हजार ७५७ खर्चून करण्यात येणार आहेत. या विकास कामांचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, बुथ अध्यक्ष प्रवीण मोहोकर, मधुकर उरणकर, रजनीश जाधव, निर्मला तैती, तानाजी झुगे, बाब्या जाधव, उमेश भास्कर, सचिन उरणकर, सुदेश खैरे, गजानन जाधव, विलास गायकवाड, मंदार देसाई, किशोर मोहोकर, यतीन देशमुख, जयेंद्र ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

(छाया : अक्षय शार्दुल)





# महाराष्ट्रातील चौथे स्वयंपाकघर पनवेलमध्ये सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अक्षय पात्र फाऊंडेशनच्या माध्यमातून पनवेल येथे नवीन सेंट्रलाईज्ड किचन सुरू केले आहे. हे त्यांचे राष्ट्रीय स्तरावरील ६८वे आणि महाराष्ट्रातील चौथे स्वयंपाकघर आहे. याद्वारे ७० शाळांमधील २० हजारहून अधिक मुलांना पोषण आहार दिला जाणार आहे. या स्वयंपाकघराचे उद्घाटन राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३) झाले.

या वेळी त्यांनी शुद्ध जेवण हे कसे असते याचे उदाहरण अक्षय पात्र आहे, असे प्रतिपादन केल. या वेळी अक्षय पात्र फाऊंडेशनचे अध्यक्ष अमितासना दासा आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. अक्षय पात्र फाउंडेशन ही १२ लाख विद्यार्थ्यांना मोफत शाळेत मधल्या वेळचे आहार हा प्रकल्प राबवणारी जगातील सर्वांत मोठी सामाजिक संस्था आहे.



अक्षय पात्र फाउंडेशन हे भारतातील कर्नाटकातील बंगलोर येथे स्थित इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा चेतना अर्थात इस्कॉनची एक ना-नफा ट्रस्ट आहे. देशातील सरकारी शाळांमध्ये माध्यान्ह भोजन योजना लागू करण्यासाठी अक्षय पात्रा ही केंद्र सरकारची सर्वात मोठी भागीदार आहे. या सस्थेचे ६८ वे सेंट्रलाईज्ड किचन पनवेल मधील साई नगर येथे सुरु झाले आहे. या किचनचे राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याहस्ते बुधवारी उद्घाटन झाले. यावेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, मुकीद काझी, युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, श्रीधर व्यंकट आदी उपस्थित होते.





**पनवेल :** भाजपच्या वतीने २०२४ सालची दिनदर्शिका महापालिकेचे माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी प्रकाशित केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. दरम्यान, ही दिनदर्शिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना भेट देण्यात आली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, समीर मोरे, रुपेश घुणे, गणेश नायक, संदिप सोनावले, मनोज बहिरा, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, संजय कदम, स्नेहलता म्हात्रे आदी उपस्थित होते.

# उरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपचंद्र शृंगारपुरे व प्राचार्य प्रा. के. ए. शामा यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

या वेळी प्रा. ए. के. गायकवाड यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास सांगितला. प्रदीपचंद्र शृंगारपुरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमात आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए.आर.चव्हाण, ऑफिस सुप्रीटेंटन्ट तानाजी घ्यार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले तर आभार डॉ. एम.जी लोणे यांनी मानले.



# विद्यार्थ्यांनी घेतली शस्त्रांची माहिती

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस रेझिंग डे सप्ताह अंतर्गत पनवेल तालुका पोलिसांनी शालेय विद्यार्थ्यांना पोलिसांनी विविध शस्त्रांची माहिती दिली.

### पोलीस रेझिंग डे सप्ताह

पोलीस दलाच्या स्थापनेचे औचित्य साधून २ ते ८ जानेवारी २०२४ दरम्यान पोलीस रेझिंग सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने नेरे हायस्कूल, नेरे या शाळेमधील विद्यार्थीना पोलीस स्थापना दिवस निमित्ताने पोलीस ठाण्याकडे उपलब्ध असलेले हत्यार यांची माहिती दिली तसेच सायबर क्राईम, महिला सुरक्षा, अमली पदार्थ दुष्परिणाम, गुड टच, बॅट टच या बाबत तसेच स्पर्धा परीक्षा, फेसबुक अथवा व्हॉट्सअॅप, वाहतुक नियम यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.





पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या उपक्रमांवेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्चना कुदळे, पोलीस हवालदार अमरसिह भालसिंग, गोपनीय विभागाचे अधिकारी कुंवर आदींसह शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

**पनवेल : प्रियांका जगदीश मढवी यांनी नव्याने सुरू केलेल्या श्री राम मेडीकलला भाजपचे कामगार नेते जितेंद्र घरत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रेमकुमार घरत उपस्थित होते.**



# सीकेटी ज्युनियर कॉलेजमध्ये 'एक मुट्ठी अनाज' उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान स्व. जनार्दन भगत साहेबांच्या ९६व्या जयंतीनिमित्त नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनियर कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून 'एक मुट्ठी अनाज' या अभिनय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यालयातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्था कर्मचारी व शिक्षकेतर बंधू भगिनी या सर्वांनी स्वयंस्फूर्तीने ऐच्छिक स्वरूपात निधी जमा केला होता. या निधीतून तांदूळ, गहू, साखर, सर्व प्रकारच्या डाळी, मसाले, खाद्यतेल इत्यादी धान्य विकत आणून ते स्वप्नालय बालिकाश्रम तक्का पनवेल व स्नेहकुंज वृद्धाश्रम नेरे पनवेल या दोन परिवारांना संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आले.

कार्यक्रमास मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिक कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वप्नालय बालिकाश्रम परिवाराचे प्रमुख दिनेश मिश्रा, संपत्ती गावंड, स्नेह कुंज वृद्धाश्रम परिवाराचे प्रमुख नितीन जोशी, तसेच ज्युनिअर कॉलेजमधील एनएसएस युनिटचे विद्यार्थी, शिक्षक अरुण पाटील, राजेंद्र गांगरे, सुचित्रा मेबल, पल्लवी चांदोरकर व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांची उपस्थिती लाभली.





संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी या कार्यक्रम प्रसंगी या अभिनव उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. आपण सर्वांनी दान द्यायला शिकले पाहिजे. जीवनात दानाचे महत्त्व विशद करताना त्यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजासाठी केलेल्या दानाचा उल्लेख आपल्या अध्यक्षपर भाषणातून केला. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमातून गरजवंताला दान देण्याची प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन केले.

अकरावी कला शाखेतील वेदांत राणे, सम्यक कांबळे, अंजली व सानिया या विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. तर बारावी कला शाखेतील प्रचिती लबडे हिने प्रार्थना म्हटली. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व नियोजन कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी केले. कार्यक्रमादरम्यान एनएसएस युनिटच्या स्वयंसेवकांनी विविध स्पर्धा प्रकारात मिळवलेल्या यशानुसार त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी कला विज्ञान व वाणिज्य विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांचे मार्गदर्शन तसेच सर्व शिक्षकांचे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमोल असे सहकार्य लाभले. तन्वी मांडवकर हिने आभार मानले.

# आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## भाजप सोशल मीडिया सेलचे पोलिसांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नुकताच शिर्डी येथील पक्षाच्या शिबिरात प्रभू श्रीरामचंद्राच्या वर जाहीर बेताल आणि आक्षेपार्ह वक्तव्य केले. वेळोवेळी हिंदू देव देवतांचा अपमान करणाऱ्या आमदार जितेंद्र आव्हाडांचा जाहीर निषेध भाजप सोशल मीडियाने केला. असून त्यांच्यावर त्वरीत गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी मागणी सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांनी केली.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि सरचिटणीस नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात पनवेल शहर पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना निवेदन दिले. या वेळी भाजप सोशल मीडिया शहर सहसंयोजक मनोज पाटील, गौरव पवार, प्रभाग १४चे अध्यक्ष गणेश म्हात्रे, सचिन नाझरे, अभिजित तुरकर उपस्थित होते.

श्रीराम जन्मभूमी अयोध्या नगरीत होत असलेल्या मंदिराच्या जिर्णोद्धार सभारंभाच्या उत्सवात तमाम रामसेवक असताना त्यांच्या भावना भडकवण्याचे काम आमदार जितेंद्र आव्हाड करत आहेत. तसेच अद्याप माफी न मागता खेद व्यक्त करून स्वतःच्या मतावर ठाम आहेत. त्यामुळे त्यांच्यावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.



## संपादकीय

# केजरीवाल यांचा कांगावा

दिल्ली मद्यघोटाळा प्रकरणी ईडीने म्हणजेच सक्तवसुली संचालनालयाने तीन वेळा समन्स पाठवूनही ईडीसमोर हजर राहण्याचे दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी टाळले आहे. दरम्यान, ईडीकडून केजरीवाल यांना अटक होण्याची शक्यता आहे असा आरडाओरडा त्यांच्याच आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी बुधवारी रात्रीपासून चालवला आहे. हा खेळ मात्र फार काळ चालणार नाही.

**मद्यघोटाळ्यासंबंधी ईडीने तिसऱ्यांदा समन्स पाठवल्यानंतर गुरूवारी सकाळपासूनच मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या दिल्लीतील घराबाहेर गोंधळ सुरू होता. दिल्ली सरकारने २०२१-२२ साली आखलेल्या दिल्ली अबकारी धोरणामध्ये घोटाळा झाल्याच्या आरोपावरून 'आप'चे नेते व माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया तसेच नंतर खासदार संजय सिंह यांना अटक झाली आहे. याच प्रकरणात मुख्यमंत्री केजरीवाल यांना अटक होण्याची शक्यता त्यांच्याच पक्षाच्या अन्य नेत्यांकडून अनेकदा जाहीरपणे व्यक्त करण्यात आली आहे. दिल्लीतल्या मद्यधोरणात बदल करताना दिल्ली सरकारने काही ठराविक कंत्राटदारांनाच फायदा मिळवून दिला असा आरोप आहे. दरम्यान, यासंदर्भात गुरूवारी पत्रकार परिषद घेऊन केजरीवाल यांनी कोणताही घोटाळा झालेला नाही असा दावा केला. ईडीने पाठवलेली समन्स बेकायदेशीर असल्याचे आपल्या वकिलांनी आपल्याला सांगितल्याचे ते म्हणाले. कायदेशीरदृष्ट्या योग्य समन्स आल्यास आपण सहकार्य करू असेही त्यांनी म्हटले. अलिकडच्या काळात पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचा प्रचार सुरू असताना 'ईडी'ने केजरीवाल यांना चौकशीसाठीचे पहिले समन्स जारी केले होते. तेव्हा प्रचारामध्ये व्यस्त असल्याचा बहाणा करून केजरीवाल यांनी चौकशीला सामोरे जाणे टाळले. 'ईडी'ने दुसऱ्यांदा समन्स पाठवले तेव्हा विपश्यनेला जात असल्याचे कारण सांगत त्यांनी पुन्हा एकदा चौकशी टाळली. तिसरे समन्स आल्यावर मात्र त्यांनी भारतीय जनता पक्ष आणि केंद्र सरकारवरच टीकेचा हल्ला चढवला. त्याचवेळी केजरीवाल यांना अटक होण्याची शक्यता आहे अशी वातावरणनिर्मिती 'आप'च्या नेत्यांनी राजधानीत केली. सरकारचा उद्देश तपास करणे नाही तर भाजपला माझी बदनामी करायची आहे असा कांगावा स्वत: केजरीवाल यांनी केला. सीबीआयने आपल्याला आठ महिन्यांपूर्वी बोलावले होते तेव्हा आपण गेलो होतो अशी पुस्तीही त्यांनी स्वत:च्या समर्थनार्थ जोडली. एकीकडे 'ईडी'च्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी असल्याचे सांगत केजरीवाल प्रत्यक्ष चौकशीला जाण्याचे मात्र खुबीने टाळत आले आहेत. दिल्लीमध्ये सलगपणे दोनदा सत्तेवर आलेल्या केजरीवाल यांना राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात रस आहे हे कधीच लपून राहिलेले नाही. २०१४ पासून जंग जंग पछाडूनही काँग्रेस पक्षाला पराभूताच्या मानसिकतेतून सावरता आलेले नाही. काँग्रेस पक्ष पराभवाच्या छायेतून सावरून पुन्हा उभारी घेऊ शकत नसल्यामुळे भारतीय जनता पक्षाला आपणच पर्याय ठरू शकतो असे आम आदमी पक्षाला व केजरीवाल यांना वाटते हेही जगजाहीर आहे. आपली प्रामाणिक व लढवय्या नेत्याची प्रतिमा कायम ठेवून लोकप्रियता कमावण्यासाठी मुख्यमंत्री केजरीवाल अधुनमधून रस्त्यावर धरणे धरण्यासारखी नौटंकीही करतात. आपल्याला अटक झाली तरी आपल्या लोकप्रियतेत भरच पडेल असे त्यांना वाटत असावे. त्याचप्रमाणे आपण ईडीला घाबरत नाही वा दाद देत नाही असे भासवून सवंग लोकप्रियता कमावण्याचाही त्यांचा प्रयत्न दिसतो. परंतु त्यांचा हा सारा खेळ फार काळ चालू शकणार नाही. ईडी लवकरच त्यांना चौथ्यांदा समन्स बजावून चौकशीसाठी ताब्यात घेईल अशीच शक्यता दाट आहे.**

# रायगडात रस्ते अपघातात घट





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात रस्ते अपघातात घट झाली आहे, परंतु अपघातांमध्ये मृत्यू पावणाऱ्यांच्या संख्येत मात्र वाढ झाली आहे. रायगड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात राष्ट्रीय महामार्ग आणि अंतर्गत जिल्हा रस्त्यांवर एकूण ७०० अपघातांची नोंद झाली. ज्यात २८१ जणांचा मृत्यू झाला. ५९३ जण गंभीर जखमी झाले, तर २२५ जण किरकोळ जखमी झाले. सन २०२२मध्ये जिल्ह्यात ७२४ अपघातांची नोंद झाली होती. यात २७६ जणांचा अपघाती मृत्यू झाला होता. जिल्ह्यात अपघातांची संख्या कमी झाली असली तरी अपघाती मृत्यूची संख्या वाढली आहे. अपघातांची संख्या कमी झाली ही समाधानाची बाब असली तरी मृत्यूंची संख्या वाढली ही एक चिंताजनक बाब आहे. यातील सर्वाधिक मृत्यू हे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावारील आहेत.

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी २०२३ साली पोलिसांच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्या वेळी त्यांनी जिल्ह्यातील अपघातांची आकडेवारी दिली. जिल्ह्यात २०१८मध्ये १०९८ अपघात झाले होते. ३०२ जाणांना यात प्राण गमवावे लागले होते, परंतु मागील काही वर्षांत जिल्ह्यातील अपघातांची संख्या सातत्याने घटत होत आहे. २०२३ मध्ये २०२२च्या तुलनेत अपघात कमी झाले, परंतु मृत्यू मात्र जास्त झाले. २०२२मध्ये ७२४ अपघात झाले. त्यात २४० जाणांचा मृत्यू झाला. २०२३ मध्ये ७०० अपघात झाले, २४२ जणांचा अपघातांमध्ये मृत्यू झाला. २०२०मध्ये सार्वात कमी ५९६ अपघात झाले, १८४ मृत्यू झाले. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांमध्ये मृतांचा आकडा २००पेक्षा जास्त आहे.

२०२३ साली मुंबई-गोवा महामार्गावर १८३ अपघात झाले. यात ६२ जणांचा मृत्यू झाला, तर १८७ जण गंभीर जखमी झाले. मुंबई-पुणे जुन्या महामार्ग ६९ अपघातांची नोंद झाली. यात १८ जणांचा मृत्यू झाला, तर ७२ जण गंभीररित्या जखमी झाले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ८५ अपघात नोंदविले गेले. यात २५ जणांचा मृत्यू झाला तर ७२ जण गंभीर जखमी झाले. वडखळ-अलिबाग राष्ट्रीय महामार्गावर २० अपघात झाले ज्यात सहा जणांचा मृत्यू झाला. इतर राज्यमार्गांवर १४७ अपघात झाले ज्यात ६० जणांचा मृत्यू झाला. जिल्हा मार्गांवर १५७ अपघातांची नोंद झाली. ज्यात ५८ मृत्यू नोंदविले गेले. एकूण अपघातांचा विचार केला तर जिल्ह्यातील तीन महामार्गांपैकी मुंबई-गोवा महामार्गावर अपघात व अपघातात मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे.

नागमोडी वळणे, वाहनचालकांचा बेदरकारपणा, त्यात वाहने उभी करून ठेवलेली असतात. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातांची संख्या वाढली आहे. औद्योगिकरणामुळे रस्त्यांवर वाढलेली अवजड वाहतूक हेदेखील अपघात वाढण्याचे एक कारण आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर लेनची शिस्त न पाळणे, वेगमर्यादा न पाळणे, गाड्यांचे टायर फुटणे ही अपघातामागची प्रमुख कारणे आहेत. याशिवाय मद्यपान करून गाडी चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे यामुळेही अपघात होत आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर सुरू असणारे रुंदीकरण, बाह्यवळण मार्ग आणि दिशादर्शक फलकांचा आभाव, रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी दोन पातळ्यांवर आम्ही काम केले. एकीकडे बेदरकार वाहनांवर सातत्याने कारवाई सुरू ठेवली, तर दुसरीकडे वाहनचालकांमध्ये वाहतून नियमांबाबत जनजागृती केली. यामुळे गेल्या वर्षभरात रस्ते अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ब्लॅक स्पॉट शोधून, त्यावर उपाययोजना करणे, ब्लिंकर्स बसवणे, गाड्यांना रिफ्लेक्टर बसविणे, बाह्यवळण रस्त्याची पूर्वसूचना देणारे फलक लावणे यांसारख्या उपाययोजना करीत आहोत, असे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

मुंबई-गोवा महामार्गावर अशी सुविधा नाही. या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडले आहे. ते काम पूर्ण झाले तर या सुविधा उपलब्ध होतील. त्याचबरोबर चौपदरीकरणामुळे अपघातदेखील कमी होतील. ३१ डिसेंबर २०२४पर्यंत या महामार्गाचे काम पूर्ण हाणार आहे. हे काम पूर्ण झाले तर या महामार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी होईल. त्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकर पूर्ण व्हायला हवे.

### वाहन अपघातांची आकडेवारी

| वर्ष | अपघात | मृत्यू | जखमी |
|---|---|---|---|
| २०१८ | १०९८ | ३०२ | ७३२ |
| २०१९ | ९९१ | २१६ | ६१३ |
| २०२० | ५९६ | २०६ | ४०९ |
| २०२१ | ६८८ | २३६ | ३७९ |
| २०२२ | ७२४ | २७६ | ६८९ |
| २०२३ | ७०० | २८१ | ५९३ |



## बदलते तंत्रज्ञान

### लोकेशन शेअरसाठी गूगल मॅपवर येणार व्हॉट्सअ‍ॅप फीचर

व्हॉट्सअ‍ॅप कंपनी ग्राहकांसाठी नवनवीन फीचर्स घेऊन येत असते. तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅपच्या 'लोकेशन शेअरिंग' फीचरबद्दलच तर माहितीच असेल; ज्याच्या मदतीने तुम्ही दुसऱ्या युजरला आपले रिअल टाइम लोकेशन शेअर करू शकता. सेटिंग गेल्यावर लोकेशन हा पर्याय दिसेल. तिथे तुम्हाला लाइव्ह लोकेशन आणि तुमचे आताचे लोकेशन पाठवा असे पर्याय येतात. त्यानंतर तिथे तुमच्या लोकेशननुसार काही पर्याय दिले जातात. त्यावर क्लिक केल्यास तुम्ही जिथे आहात, ते लोकेशन तुमच्या कुटुंबाला किंवा मित्रमैत्रिणींना तुम्ही सहज पाठवू शकता.




आता हे खास फीचर गूगल मॅपदेखील अ‍ॅण्ड्रॉइड, आयओएस आणि पीसीच्या वापरकर्त्यांसाठी घेऊन येत आहे. गूगल मॅप्सवरून युजर्स त्यांचे रीअल टाइम लाइव्ह लोकेशन त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती आणि मित्र-मैत्रिणींबरोबर शेअर करू शकणार आहेत. गूगल मॅप्सवरील रीअल टाइम लाइव्ह लोकेशन अगदीच व्हॉट्सअ‍ॅपप्रमाणेच असेल. तुम्ही इतरांना पाठवलेले लाइव्ह लोकेशन कोण आणि किती वेळ पाहू शकेल याचासुद्धा तुम्हाला पर्याय दिला जाईल तसेच खास गोष्ट अशी की, जेव्हा तुम्ही लोकेशन एखाद्या व्यक्तीस शेअर कराल तेव्हा ते तुमच्या डिव्हाइसची बॅटरी पॉवर आणि चार्जिंगसुद्धा समोरची व्यक्ती पाहू शकेल.

लोकेशन शेअरिंगवरील गूगलच्या सपोर्ट पेजनुसार मॅप्समध्ये लोकेशन हिस्ट्री बंद असतानादेखील हे फीचर काम करते. तुमचे लाइव्ह लोकेशन 'गूगल मॅप्स'वरून इतरांना पाठवण्यासाठी तुमच्या अ‍ॅण्ड्रॉइड, आयफोन किंवा आयपॅडच्या गूगल मॅप्स या अ‍ॅपवर जा, वरच्या उजवीकडे प्रोफाइल चिन्हावर टॅप करा आणि लोकेशन शेअरिंग निवडा. त्यानंतर तुम्हाला तुमचे लोकेशन किती काळ शेअर करायचे आहे हे निवडण्याचा पर्याय मिळेल (तुम्ही एक दिवसापर्यंत तुमचे स्थान शेअर करणे निवडू शकता). गूगल संपर्क निवडून त्यांच्या नावावर क्लिक करून, त्यांना लोकेशन पाठवू शकता तसेच लोकेशन शेअर करण्यासाठी शेअरिंग मेन्यूमधील आणखी पर्याय निवडू शकता म्हणजेच व्हॉट्सअ‍ॅप, आय मेसेज आदींसारख्या इतर मेसेजिंग अ‍ॅप्सवर तुमच्या रिअल टाइम लोकेशनची लिंक शेअर करू शकता.

# मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे



**निमित्त**

श्रेष्ठ मराठी कादंबरीकार श्रीपाद नारायण पेंडसे यांची ओळख साहित्यिक अशी राहिली आहे. त्यांचा जन्म ५ जानेवारी १९१३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुर्डी या गावी झाला.

श्रीपाद पेंडसे यांचे इ. तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण कोकणात दापोली येथे, नंतर बीएस्सीपर्यंतचे मुंबईस झाले. काही काळ (१९३३-४२) ते शिक्षक होते. पुढे मुंबईच्या बेस्ट या परिवहन संस्थेत ते नोकरी करू लागले आणि उपजनसंपर्क अधिकारी पदावरून १९६८मध्ये निवृत्त झाले. खडकावरील हिरवळ (१९४१) हे पेंडसे यांचे पहिले पुस्तक. त्यात त्यांनी लिहिलेली शब्दचित्रे संग्रहीत केलेली आहेत. अशा शब्दचित्रात्मक लेखनाकडून नंतर ते कादंबरीकडे वळले. एल्गार (१९४९) या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला जाणत्या रसिकांचा आणि समीक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर हद्दपार (१९५०) गारंबीचा बापू (१९५२), हत्या (१९५४), यशोदा (१९५७), कलंदर (१९५९), रथचक्र (१९६२), लव्हाळी (१९६६) आणि ऑक्टोपस (१९७२) अशा नऊ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. परिसरातील कोकणचा निसर्गसमृद्ध प्रदेश त्यांनी प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा झाली. रथचक्र, लव्हाळी आणि ऑक्टोपस या तीन कादंबऱ्या, पेंडशांच्या कादंबरीने घेतलेल्या वेगळ्या वळणाच्या द्योतक आहेत. रथचक्र या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले (१९६४). कादंबरीच्या रूपाची एक वेगळी, अधिक परिपक्व जाणीव जोपासणारे कादंबरीकार म्हणूनही ते ख्याती पावले.

पेंडसे यांनी नाट्यलेखनही केलेले आहे. राजे मास्तर (१९६४), यशोदा (१९६५), गारंबीचा बापू (१९६५), असं झालं आणि उजाडलं (१९६९) ही त्यांची नाटके त्यांच्या अनुक्रमे हद्दपार, यशोदा, गारंबीचा बापू आणि लव्हाळी या कादंबऱ्यांची नाट्यरूपे असून महापूर (१९६१), संमुसांच्या चाळीत (१९६७), चक्रव्यूह (१९७०) अशी काही स्वतंत्र नाटकेही त्यांनी लिहिली आहेत. जुम्मन (१९६६) हा त्यांचा कथासंग्रह.

श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस हे त्यांचे आत्मचरित्र १९७४मध्ये प्रसिद्ध झाले. आपल्या जीवननिष्ठांचा आणि जीवनातील घटनांचा अन्वयार्थ लावण्याची डोळस चिंतनशीलता या आत्मचरित्रात आढळून येते. लेखक म्हणून अनेक सन्मान पेंडसे ह्यांना लाभलेले आहेत. हद्दपार, हत्या, कलंदर या कादंबऱ्यांना व संमूसांच्या चाळीत आणि चक्रव्यूह या नाटकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळालेले आहेत.

अन्य भाषांतून पेंडसे यांचे साहित्य अनुवादित झालेले आहे. गारंबीचा बापू गुजराती, हिंदी व इंग्रजी या भाषांतून, हद्दपार गुजराती व इंग्रजीमधून रथचक्र गुजराती व हिंदीमधून आणि हत्या व कलंदर गुजरातीतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. रॉकफेलर फाउंडेशनच्या लेखकांकरिता असलेल्या 'प्रवास शिष्यवृत्ती'-करिता फाउंडेशने १९५५मध्ये त्यांची निवड केली होती. ही शिष्यवृत्ती मिळविणारे पेंडसे हे मराठीतील पहिले साहित्यिक. या शिष्यवृत्तीच्या काळात इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, पश्चिम, जर्मनी, अमेरिका, जपान, फिलिपीन्स, श्रीलंका आदी देशांत पेंडसे गेले आणि अनेक परदेशी साहित्यिकांशी विचारविनिमय केला. २४ मार्च २००७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**-लता मोहरीर**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : शहराची ग्रामदेवता सोमजाई देवीचा रथोत्सव पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. (छाया : अमेय नाझरे)**

## आरोग्य प्रहर

### महिलांनो, वयाच्या तिशीनंतर 'या' चाचण्या करून घ्या

वयाच्या तिशीत पोहचल्यानंतर प्रत्येकाच्या खांद्यावर जबाबदारीचे ओझे वाढते. व्यावसायिक स्पर्धेमुळे काम वाढते. कुटुंबाकडेही लक्ष द्यायचे असते. या सर्व व्यापात महिला स्वत:च्या शरीराकडे फारसे लक्ष देत नाहीत. तज्ज्ञ सांगतात तिशीपासूनच शरीराची योग्य काळजी घेतली पाहिजे. स्त्रीरोगतज्ज्ञ, डॉ. शोभा गुप्ता यांनी याबाबत सविस्तर महिती दिली.



३० वर्षांच्या वयानंतर महिलांना स्तनाचा कर्करोग होण्याची अधिक शक्यता असते. महिलांनी स्तनांची घरच्या घरी तपासणी केली पाहिजे. स्तनात गाठ लागते का? निप्पलमधून स्राव होतोय? त्वचेचा रंग बदललाय का? याची तपासणी करावी.

गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण महिलांमध्ये दिवसेंदिवस वाढतेय. स्तनांच्या कॅन्सरनंतर भारतात महिलांमध्ये गर्भाशयाचा कॅन्सर सर्वांत जास्त आढळून येतो. २१ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी पाच वर्षांतून एकदा तरी पॅप स्मीअर चाचणी करून घ्यावी, अशी शिफारस केली जाते.

वयाच्या ३५ वर्षांहून अधिक वयाच्या महिलांनी प्री-डायबेटिस किंवा मधुमेह तपासण्यासाठी दर तीन वर्षांनी रक्तातील ग्लुकोज तपासणी करणे आवश्यक आहे. जर एखादी स्त्री लठ्ठ असेल किंवा कुटुंबात कुणाला मधुमेहाचा आधीच त्रास असेल, तर लवकर तपासणी करणे आवश्यक आहे.

स्त्रियांना रक्तदाबाची तपासणी करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त ज्या स्त्रियांना उच्च रक्तदाब किंवा रक्तदाबसंबंधित समस्यांचा कौटुंबिक इतिहास आहे, त्यांनी नियमितपणे स्वतःची तपासणी करणे आवश्यक आहे. ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी थोडीशी काळजी आणि नियमित तपासणी या दोन उपायांनी आपण थायरॉइडच्या विकारांमुळे होणारा त्रास टाळू शकतो. हा त्रास विशेषतः महिलांना अधिक होत असल्याने त्यांनी वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने चाचणी जरूर करावी.

व्हिटॅमिन डी चाचणी रक्तातील व्हिटॅमिन डीची पातळी मोजते. व्हिटॅमिन डी निरोगी हाडे आणि दात मजबूत ठेवण्यासाठी तसेच रोगप्रतिकारकशक्तीसाठी महत्त्वाची आहे. प्री-मार्शल चाचण्यांमध्येदेखील वाढ होत आहे, ज्यात थॅलेसेमिया आणि इतर हिमोग्लोबिनोपॅथिक्स आणि लैंगिक संक्रमित रोगांसारख्या रक्ताशी संबंधित विकार तपासण्यासाठी आवश्यक रक्तचाचण्या केल्या जातात. याशिवाय मानसिक समस्याही तपासल्या पाहिजेत.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी उंटांच्या वास्तव्यामुळे दुर्गंधी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या मठाच्या स्मशानभूमी जवळ श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती उंटाची सवारी करण्यासाठी आणलेल्या उंटांच्या वास्तव्यामुळे व विष्ठेमुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे.



स्मशानभूमीच्या बाजूलाच असलेल्या जागेवर व त्या ठिकाणी असलेल्या रस्त्यावरती हे उंट दिवसभर बांधून ठेवलेले असतात. उंट आपली विष्ठादेखील त्याच ठिकाणी टाकत असल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण होत आहे. मठाच्या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व गणेश विसर्जन मार्ग यासाठी रामचंद्र केळसकर यांनी आपली दोन गुंठे जागा शासनाला दिलेली आहे, परंतु श्रीवर्धन नगर परिषदेने ही जागा महसूल विभाग कडून अद्याप नगर परिषदेच्या नावावर करून घेतलेली नाही. उंट ज्या ठिकाणी रस्त्यावर बांधलेले असतात तिथून काही अंतरावरती अवधूत मंदिर आहे.

या अवधूत मंदिराच्या आवारामध्ये दशक्रिया व पिंडदान विधी करण्यात येतात. ही जागा हिंदू धर्माच्या परंपरेप्रमाणे उत्तर कार्यासाठी राखीव ठेवलेली आहे.

अनेक वेळा श्रीवर्धन समुद्रकिनारी येणारे पर्यटक, सहलीच्या बसेस या परिसरात जेवण देखील बनवत असल्याने दिवस कार्यासाठी येणाऱ्या नागरिकांना अडचणीचे होत आहे.

## मोरे महिला महाविद्यालयात आरोग्य शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एम बी मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथे महाविद्यालयाच्या 'महिला विकास कक्ष', सुदर्शन केमिकल्सचे 'सुधा-सीएसआर' आणि आयएएचव्ही, मुंबई यांनी संयुक्तिकपणे वय १४- १७ वर्षे या वयोगटातील मुलींसाठी २६ ते २८ डिसेंबर २०२३ दरम्यान तीन दिवसांचे आरोग्य शिबीर आयोजित केले होते. या शिबिरास मोरे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थिनींचा उदंड प्रतिसाद मिळाला.

या शिबिराच्या दुसऱ्या टप्प्यात वय १८ ते २१ वर्षे वयोगटातील महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनीना आरोग्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. आरोग्य शिबिराचा दुसरा टप्पा ३ ते ५ जानेवारी २०२४ रोजी आयोजित केले होते.

मासिक पाळीच्या दिवसांतील मानसिक आरोग्य आणि वेदना कमी करणारे योगासने यांचे प्रशिक्षण पुढील तीन दिवसांमध्ये मुलींना दिले जाणार आहे. आयएएचव्ही, मुंबई येथील प्रशिक्षक पूजा शर्मा आणि मृण्मयी पवार या मुलींना विविध आसनांचे प्रकार आणि त्यांचे मासिक पाळीच्या दिवसांतील शरीरावर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन करीत आहेत.

मोरे महिला महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष च्या प्रमुख प्रा दिपाली वारंगे आणि 'सुधा-सीएसआर'चे चेतन चौधरी यांनी या शिबिराचे नियोजन केले. महिला महाविद्यालयाच्या १२५ विद्यार्थिनींनी आरोग्य शिबिरात पहिल्या दिवशी नोंदणी करून सहभाग घेतला.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## श्री क्षेत्र २१ गणपती येथे हरीपाठ कार्यक्रम

**पाली :** सुधागड तालुक्यातील श्री क्षेत्र एकवीस गणपती येथे संकष्ट चतुर्थी निमित्त हरीपाठ कार्यक्रम आयोजित केला होता व या कार्यक्रमाचे नेतृत्व ह.भ.प गुरुवर्य महेश महाराज देशमुख, हरीओम सतनाम वारकरी सांप्रदाय मंडळ सुधागड, पाली नोंदणी क्र. एफ. ११५०९ यांच्या सहकार्याने झाला. या हरीपाठ कार्यक्रमासाठी आलेल्या भाविक भक्तांनी, पंचक्रोषीतील वारकरी यांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

## माणगावात मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि. १०) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत एचडीएफसी बँकेच्या समोर, मुंबई-गोवा महामार्गालगत पेपर विक्रेते नितीन मेथा यांचा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे.

शिबिराचा लाभ बहुजन समाजातील सर्व गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन उद्योजक खेमचंद (विजयशेठ) मेथा यांनी केले आहे. या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे.

शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-पुष्पकनगर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाचा भुखंड श्री. सुभास बुधाजी पावणे यांचेकडून भुखंड विक्री तथा भाडेपट्टा हक्क हस्तातरण आणि अनुशंगिक कराराने कायमस्वरुपी आमचे आशिलांचे लाभात हस्तातरीत करून घेण्याचे योजिले आहे.

**भुखंडचे वर्णन**

| भुखंड क्रमांक | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर, (दापोली) ता. पनवेल, जि. रायगड | ३ | ३५७ | ४०० |

वर नमूद भुखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडासचे हस्तातरण भुखंड विकी तथा भाडेपट्टा हक्क हस्तांतरण आणि अनुशंगिक कराराने आमचे आशिलांचे लाभात कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**ठिकाण :- पनवेल,**
**दिनांक :- ०४/०१/२०२४**

**सही/**
**ॲड. शरद जाधव**
**संपर्कासाठी पत्ता –** तळमजला, रॉयल प्राईड बिल्डीग, भुखंड क.११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड मो.नं. ९८२०६३७१७५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस हया जाहीर नोटीसने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुदद, ताबा, कबजा, मालकी वहीवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खलीलप्रमाणे

**मौजे मालाठे ता तळा जि रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र हे आर | आकार रू.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| सवता दगडू ठमके व इतर | ४३६ | जि ०-६३-००<br>पोख ०-२१-००<br>०-८४-०० | ०.२५ | खालसा |
| सखाराम कानू ठमके व इतर | ४३५ | जि ०-३८-००<br>पोख ०-१२-००<br>००-८२-०<br>पैकी क्षेत्र<br>०-२०-०० | ०.२० | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे अशिल जाई अथर्व कोतवाल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा , वहीवाट वचनचिठठी, दावा, दरखास्त मॉरगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन, भागीदारी, बक्षीस, कुळ वहिवाट, पोटगी अथवा मिळकतीबाबत वाद तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणातीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक रहाणार नाही. हे कळावे,

**दि ०५/०१/२०२४**

**सही/-**
**ॲड. श्री पी. जी. दाभाडे**
**रा प्लॅट नं ४०२ बी विंग चौथा मजला साई नगरी सोसायटी छत्रपती शिवाजी नगर वागळे हॉस्पीटल जवळ रोहा ता रोहा जि रायगड मो नं. ९२७२७१३९५६**

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२३ ते २०२८ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे १. श्री प्रेरणा सहकारी पतपेढी लि. कळंबोली, ता. पनवेल जि. रायगड २. शांतीवन नागरी सहकारी पतसंस्था मर्या शांतीवन, नेरे, ता. पनवेल, जि. रायगड ३. शांतीवन सहकारी ग्राहक संस्था मर्या. शांतीवन, नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०८/०१/२०२४ ते १२/०१/२०२४, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १५/०१/२०२४, नामनिर्देशन पत्र माघारी दिनांक १७/०१/२०२४ ते दिनांक ३१/०१/२०२४ व आवश्यकतेनुसार मतदान दिनांक ११/०२/२०२४ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती संस्थेचे कार्यालयांत व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(विजय सडके)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

### पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६**

कार्यालय :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल – ४१० २०६ दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२, Email Id: panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/धकवि/२५२३/प्र.क्र.३५८/३०/२०२४ दिनांक :०४/०१/२०२४

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी व ग्राफिटी करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता खाली नमूद केलेल्या बार्बीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी व ग्राफिटी करणे | दि.०४/०१/२०२४ ते दि.१०/०१/२०२४ रोजी दु. १२:०० वाजेपर्यंत (०७ दिवस) |

**कामाचा तांत्रिक तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| Sr.No | DESCRIPTION | Quantity | Rate (excluding GST) |
|---|---|---|---|
| 1 | Swachh Sarvekshan related grafity, slogans, drawings etc. (Acrylic color paint, apex plastic paint, painting material artist included) | 1 | Rs.... Per square meter |

१) दरपत्रके दि. १०/०१/२०२४ रोजी दु.१२:०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात अथवा panvelcorporation.swm@gmail.com वर स्विकारण्यात येतील,

२) अटी व शर्ती युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपलिका**

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्या येते की, माझे पक्षकार १. ऊमर ईस्माईल मुजावर रा. खानावले पो. पोयजे ता. पनवेल जि. रायगड २. हुसेन सरदारमियाँ मुजावर रा. खानावले पो. पोयजे ता. पनवेल जि. रायगड. ३. आयुब मोहम्मद कासीम मुजावर रा.३/९१ एम एच बी कॉलनी व्ही. एन. पुरव मार्ग चुनाभटटी सायन मुंबई ह. मु. सी /५०४ निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड माझ्या यांनी दिलेल्या माहिती दस्त व अधिकारावरुन जाहीर प्रगटन देण्यात येत आहे,

असे की माझे पक्षकार यांनी मिळकत मौजे सुभानशाह दर्गा पनवेल ता. पनवेल जि. रायगड प्लॉट क्र. २१० पैकी अंदाजे १५ गुंठे मीळकतीचे दि. २५/१०/२०१६ एम. ओ. यु./ समझोता करार, अधिकारपत्र तथा भाडेपटा व तसेच दि. २८/१०/२०१६ रोजी नोदनीकृत मुखत्यारआम दस्त क्र. ९४३८/२०१६ माझे पक्षकार यांनी अस्लम अ. म. मुन्शी रा. दुकान क्र.११-ए हाय पॉईंट सोसायटी, तक्का ता. पनवेल जि. रायगड. ह. मु. सदनिका क्र. ३०.१ तिसरा माळा निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड यांच्या हक्कात नोंदवुन दिला होता त्यांनी सदरच्या मुखत्यारआमपत्रात खाडखोड करुन माझ्या पक्षकारांचा विश्वसघात करुन फसवणूक केली व ते माझे पक्षकाराचे हीत जोपासत नाही व करारातील अटी व शर्तीचा भंग केला म्हणुन माझे पक्षकारानी वर नमुद तिन्ही दस्त रद्द केलेले आहे व तशी नोटीस सुध्दा पोस्टाने पाठवलेली आहे.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, त्यांनी अस्लम अ. म. मुन्शी रा. दुकान क्र. ११-ए हाय पॉईट सोसायटी, तक्का ता. पनवेल जि. रायगड. ह. मु. सदनिका क्र. ३०१ तिसरा माळा निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड यांच्याशी वरील मिळकती संबंधी कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधितावर राहील ते माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

**सही/-**
**एम. ए. मुजीब**
**ॲडव्होकेट**
मोहम्मदी मस्जिद जवळ, सिल्क मिल्स कॉलनी, पैठण रोड, औरंगबाद, मो. ९८२२०३४२१४

### महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ११६ सन २०२३-२०२४**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता.महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ – २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक ०५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १२/०१/२०२४ रोजी १८.०० वाजे** पर्यंत **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक १५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १५/०१/२०२४ रोजी ११.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाड दिवाणी न्यायालय येथील वरिष्ठ कर्मचारी कार्यालयात फर्निचर पुरविणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२०५९) | ८४०६९८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | महाड कनिष्ठा विभाग न्यायालयाती वकील कक्षात फर्निचर उपलब्धा करून देणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२०५९) | ८४२७४४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | महाड येथील दिवाणी न्यायालय व्यासपीठ व न्यायालय सभागृह येथे फर्निचर पुरविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (२०५९) | ८३७८५२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | महाड येथे कनिष्ठा विभाग न्यायालयात फर्निचर पुरविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२०५९) | ८३३०५० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | महाड येथे कनिष्ठा विभाग न्यायालयात कर्मचारी विभाग रुम मध्ये फर्निचर पुरविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (२०५९) | ८३१२७८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | महाड येथील कामगार न्यायालयात फर्निचर पुरविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२०५९) | ८२९८७० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे चोचिंदे बौध्दावाडी येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२२२५) | ८२०४५० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे बोरवले चाळीचा कोंड येथे सभामंडप बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ४८९४०१ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | मौजे मोरसडे येथे सभामंडप बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ४८९२८१ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १० | मौजे देवपूर वरचीवाडी येथे सभामंडप बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ४०८०५८ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ११ | महाड येथील शाखा अभियंता कार्यालयाची किरकोळ दुरूस्ती करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२०५९) | ३८२११५ | ४००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/६६**
**दिनांक : ०४/०१/२०२४**

**विमाका/ कोवि/२०२३-२०२४/२८३**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. गणेश पांडूरंग मोरे रा. मु. गिरवले ता. पनवेल, जि. रायगड** यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२३ | २ | एकूण क्षेत्र ०-५३-८०<br>पैकी ०-३५-८०<br>पैकी ०-१७-८० गुंठे क्षेत्राबाबत | ११.२४<br>७.४८ |

**०-१७-८० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राबाबत**

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक: ०४/०१/२०२४**

**सही/**
**श्री. निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**

पत्ता: शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स पहीला मजला, भाजी मार्केट जवळ,पनवेल मो नं ८१०८५५८२८९

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्या येते की, माझे पक्षकार १. ऊमर ईस्माईल मुजावर रा. खानावले पो. पोंयजे ता. पनवेल जि. रायगड २. हुसेन सरदार मियों मुजावर रा. खानावले पो. पोयजे ता. पनवेल जि. रायगड. ३. आयुब मोहम्मद कासीम मुजावर रा.३/९१ एम एच बी कॉलनी व्ही. एन. पुरव मार्ग चुनाभटटी सायन मुंबई ह. मु.सी /५०४ निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड माझ्या यांनी दिलेल्या माहिती दस्त व अधिकारावरुन जाहीर प्रगटन देण्यात येत आहे,

असे की माझे पक्षकार यांनी मिळकत मौजे सुभानशाह दर्गा पनवेल ता. पनवेल जि. रायगड प्लॉट क्र. २१० ज्याचे क्षेत्रफळ ३३६०.९ चौ. मी. मीळकतीचे दि. १७/०१/२००५ रोजी मिळकत विकसीत करण्याचा नोदणीकृत करारनामा दस्त क्र.३७५/२००५ व तसेच दि. ०४/०४/२००२ रोजी मुखत्यारआम माझे पक्षकार यांनी महालक्ष्मी कंस्टक्शन तर्फे रमेशकुमार जवानमलजी जैन रा. ७७३ इस्माइल मंझील शॉप क्र. ४ एम. जी. रोड पनवेल जि. रायगड. ह. मु. सदनिका क्र. ४०३ चौथा माळा बी. विंग निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड यांच्या हक्कात नोंदवुन दिला होता परंतु ते माझे पक्षकाराचे हीत जोपासत नाही व करारातील अटी व शर्तीचा भंग केला म्हणुन माझे पक्षकारानी वर नमुद दोन्ही दस्त रद्द केलेले आहे. व तशी नोटीस सुध्दा पोस्टाने पाठवलेली आहे.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, त्यांनी महालक्ष्मी कंस्ट्रक्शन तर्फे रमेशकुमार जवानमलजी जैन रा. ७७३ इस्माइल मंझील शॉप क्र. ४ एम. जी. रोड पनवेल जि. रायगड. हं. मु. सदनिका क्र. ४०३ चौथा माळा श्री. बी.विंग निक्की टॉवर इसराइल तलाव पनवेल जि. रायगड यांच्याशी वरील मिळकती संबंधी कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार कुरु नये केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधितावर राहील ते माझ्या पक्षकारांवर राहणार नाही.

**सही/-**
**एम. ए. मुजीब**
**ॲडव्होकेट**
मोहम्मदी मस्जिद जवळ, सिल्क मिल्स कॉलनी, पैठण रोड, औरंगबाद, मो. ९८२२०३४२१४

# 'दिबां'च्या जयंतीदिनी होणार रोजगार मेळावा

## १०० पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीदिनी १३ जानेवारी २०२३ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात सकाळी ९ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बुधवारी (दि. ३) घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये या महारोजगार मेळाव्याचे आयोजक माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी दिली.

स्थानिक भूमिपुत्र, नवी मुंबईकरांना त्याचा लाभ घेता येईल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अनुषंगाने निर्माण होत असलेल्या रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकता विकासाच्या संधींची माहिती देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मंडळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय संघर्ष कृती समिती यांच्या सहयोगाने तसेच माजी खासदार नाईक यांच्या माध्यमातून हा महारोजगार मेळावा होत आहे.

केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील, आमदार गणेश नाईक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, माजी खासदार



डॉ. संजीव नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक उपस्थित राहणार आहेत. या महारोजगार मेळाव्यामध्ये फॅसिलिटी मॅनेजमेंट, फिनान्स, इन्शुरन्स, सिक्युरिटी, उत्पादन, टयुटोरियल्स, इंजिनिअरिंग, फूड, रिटेल, कम्प्युटर हार्डवेअर ॲन्ड नेटवर्कींग, हॉस्पिटल्स, सेल्स ॲन्ड मार्केटींग, हॉटेल इंडस्ट्री इत्यादी क्षेत्रातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अनुषंगाने निर्माण होत असलेल्या विविध रोजगार, उद्योजकता विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधीची माहिती आणि या संधी प्राप्त करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञांचे आणि यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन शिबिर महारोजगार मेळाव्यात होणार आहे. केंद्र सरकारचा सूक्ष्म, लघु आणि मध्यम मंत्रालय म्हणजेच एमएसएमई, कौशल्य विकास मंत्रालय, सिडको महामंडळदेखील या महारोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होणार आहेत. नोकऱ्या मिळणाऱ्यांना तत्काळ नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे.

**स्टार्टअप सुरू करण्यासाठी माहिती व प्रशिक्षण**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अनुषंगानेदेखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या संधीमध्ये तरुणांना एखाद्या व्यवसायाचा स्टार्टअप सुरू करण्यासाठी तंत्रज्ञानाची माहिती व प्रशिक्षण या महारोजगार मेळाव्यात मिळणार आहे.

या वेळी माजी महापौर जयवंत सुतार, जिल्हा भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा माधुरी सुतार, माजी स्थायी समिती सभापती डॉक्टर जयाजी नाथ, स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, माजी नगरसेवक अशोक गुरखे, युवा नेते संकल्प नाईक, सामाजिक कार्यकर्ते विजय वाळुंज, प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे दीपक पाटील आणि मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईत गुन्हे उकल टक्केवारीत प्रगती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ऑनलाईन पद्धतीने फसवणूक होण्याच्या प्रकरणांत प्रचंड वाढ झाली असून सायबर पोलीस ठाण्याची निर्मिती नवी मुंबईत गेल्या वर्षी करण्यात आली. नवी मुंबईत पोलिसांना २०२३ हे वर्ष संमिश्र गेले असून गेल्या वर्षीच्या तुलनेत गुन्ह्यांची नोंद जास्त झाली असली तरी गुन्हे उकल टक्केवारीत आठ टक्क्यांनी प्रगती आहे.

सन २०२२ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबरदरम्यान ५ हजार ८११ विविध गुन्ह्यांची नोंद झाली होती, तर ३ हजार ७८४ गुन्ह्यांची उकल झाली होती. २०२३ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबरदरम्यान ६ हजार १२८ गुन्ह्यांची नोंद, तर ४ हजार ४८० गुन्हे उकल करण्यात आले. २०२२ च्या तुलनेत २३ मध्ये गुन्ह्यांची नोंद जास्त असली तरी २०२२ मध्ये एकूण ६५ टक्के गुन्हेउकल झाली, तर यंदा हेच प्रमाण ७३ टक्के झाले आहे.

आतापर्यंतचा सायबर पोलीस ठाण्याचा आढावा घेतला असता इतर पोलीस आयुक्तालयांच्या तुलनेत चांगली कामगिरी सुरू आहे.शहरात आत्महत्येच्या प्रमाणात तब्बल नऊने वाढ झाली असून २०२२ मध्ये नऊ जणांनी आत्महत्या केल्या होत्या, तर २०२३ मध्ये २३ जणांनी स्वत: होऊन आपले जीवन संपवले. महिला अत्याचारात किंचित घट झाली असून २०२२ मध्ये ६८८ घटनांची नोंद झाली होती, तर २०२३ मध्ये ६८१ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

आयुक्तांनी पदभार स्वीकारताच वाहतूक व्यवस्था, सायबर गुन्हेगारी आणि अमली पदार्थविरोधी कठोर कारवाईचे मनसुबे स्पष्ट केले होते. त्यानुसार ११ मे २०२३ ला आयुक्तालय क्षेत्रातील पहिले सायबर पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. हे पोलीस ठाणे सुरू होताच सायबर गुन्ह्यांची उकल होणे सुरू झाले. त्यात सेक्सोर्शन, नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक, इतर ऑनलाइन फसवणूक आदी गुन्ह्यांची उकल होणे सुरू झाले. यासाठी सायबर विषयात उत्सुक असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.




**उत्साहाचे वातावरण**

*नवी मुंबई पोलीस विभागात सध्या उत्साहाचे वातावरण आहे. कारण पोलीस विभागातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध उपक्रम राबवत आहेत. २०२३ मध्ये नवी मुंबई पोलीस क्षेत्रात सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे सायबर पोलीस ठाण्याची उभारणी झाली आहे.*

३१ डिसेंबर २०२२ ला अमली पदार्थविरोधी कारवाई करताना वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात करताना नायजेरियन टोळीच पकडण्यात आली. यात पाच महिलांचा समावेश होता. या कारवाईने नवीन आलेल्या आयुक्तांनी आपल्या कामाची चुणूक दाखवली होती. तसेच नुकतेच गेल्या आठवड्यात खोपोलीनजीक एमडी हा अमली पदार्थ बनविणारा कारखाना उद्ध्वस्त करतानाच लोकांना अटक करीत लाखो रुपयांचा अमली पदार्थ जप्त केला. याशिवाय हुक्का पार्लर, अवैध मद्या विक्री, फिरस्तीप्रमाणे मद्या विक्री करणारे अशा लोकांवरही कडक कारवाई केली गेली.

# आदिवासी बांधवांना रेशन कार्डचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जांभिवली गावातील अनेक वर्ष रेशन कार्डपासून वंचित असलेल्या आदिवासी बांधवांना रेशन कार्डचे वाटप मंगळवारी (दि. २) करण्यात आले.

जांभिवली वाडीमधील आदिवासी समाजबांधवांना अनेक वर्षे रेशन कार्डपासून वंचित होते. रेशन कार्ड नसल्याने अनेक वर्षे सरकारी योजनांचा लाभ घेता येत नव्हता. याची दखल घेत उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या मार्गदर्शनाखाली सवणे गावाचे नेते भगवान देशमुख, कृष्णा कोंडीलकर, आपटा विभागीय युवा मोर्चा अध्यक्ष कल्पेश कोंडीलकर यांच्या प्रयत्नातून रेशन कार्ड मिळवून देण्यात आले.

रेशन कार्ड मुळे आदिवासी बांधवांना सरकारी योजनांचा लाभदेखील घेण्यास



मदत होणार असल्याकारणाने आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त केला आहे. रेशन कार्डचे वाटप माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी केळवणे पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष सुशील ठाकूर, हभप महादेव महाराज, बळीराम कोंडीलकर, उपसरपंच अनिता कोंडीलकर, दिलीप टकले, कालुराम माळी, चंदर कोंडीलकर, धर्मा कोंडीलकर, सदस्य अमित कोंडीलकर, संजय कोंडीलकर, जगदीश म्हसकर, सतीश कोंडीलकर, अनंता कोंडीलकर, मंगेश कोंडीलकर, कमलाकर कोंडीलकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून 'त्या' मृताच्या वारसांना मदत

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर ६ येथील तुलसी दर्शन इमारतीचे स्लॅब कोसळून दोघांचा मृत्यू झाला होता. तर चार जण जखमी झाले होते. ही घटना घडल्यावर तातडीने आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून जखमींना आर्थिक मदत मागितली होती. अखेर या रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रक्कम तीन लाख रुपयांची आर्थिक मदत म्हणून लाभ देण्याचे शासनाने जाहीर केले आहे. त्यामुळे रुग्णांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीमधून असंख्य गोर गरीबांना निधीच्या माध्यमातून सुलभ शस्त्रक्रिया होत आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या चार महिन्यांत गोरगरीब-गरजू रुग्णांना तीन लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशीलतेमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अनेक-विविध आजारांचा समावेशदेखील करण्यात आला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांचे प्राण वाचविण्यात यश मिळविले आहे.

# पनवेल बागेची वाडी येथे पीएम जन-मन अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली मार्फत बहुसंख्य आदिवासी वस्त्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी आणि सरकारी योजना १०० टक्के सुनिश्चित करण्यासाठी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम जन-मन) मोहीम सुरू केली आहे. या महाअभियानाची सुरुवात पनवेल तालुक्यातील बागेची वाडी येथे करण्यात आली.

यावेळी जनजाती कार्य मंत्रालय भारत सरकार नवी दिल्लीचे प्रतिनिधी मुकेशकुमार यादव, पेण प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव मॅडम, पनवेलचे तहसीलदार विजय पाटील, गटविकास अधिकारी संजय भोये, विद्युत महावितरणचे अभियंता विकास कांबळे, संबंधित विभागाचे सर्व अधिकारी आणि मोठ्या संख्येने आदिवासी ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी माहिती, शिक्षण आणि संवाद या मोहिमेतून रायगड जिल्ह्यातील आदिम



जमात म्हणजेच कातकरी समाजाच्या विविध समस्यांची माहिती घेऊन कृती आराखडा तयार केला जाईल आणि त्याची विविध योजनांच्या माध्यमातून पूर्तता केली जाईल. या महाअभियानादरम्यान कातकरी समाजातील लाभार्थ्यांचे आधार कार्ड काढणे, जनधन बँक खाते उघडणे व त्यास आधार कार्ड लिंक करणे, आयुष्यमान भारत कार्ड काढणे, किसान क्रेडिट कार्ड, किसान सन्मान निधी, जातीचे प्रमाणपत्र काढणे, घरकुलांचा लाभ देणे, हर घर जल योजनेचा लाभ देणे, विज जोडणी करणे इ. विषयी सविस्तर माहिती प्रकल्प अधिकारी शशिकला अहिराव मॅडम यांनी दिली. कातकरी समाजाने या मोहिमेत सहभागी होऊन विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

कातकरी समाजाला त्यांच्या हक्काबद्दल जागरूक करून वैयक्तिक हक्क आणि मूलभूत सुविधांसह सर्व कुटुंबांना माहिती देण्याच्या उद्देशाने ही मोहीम सुरू केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने या मिशनला मंजुरी दिली असून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती गठीत केली आहे तर तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, अशी माहिती प्रकल्प अधिकारी यांनी या वेळी दिली. हे अभियान यशस्वी करण्यासाठी आजच बागेची वाडी, चावणे, नेरे पाडा आणि खालापूर तहसील येथे विविध दाखले काढण्याचे कॅम्प आयोजित केल्याची माहिती गट विकास अधिकारी संजय भोये यांनी दिली तर तहसीलदार विजय पाटील यांनी उपस्थित ग्रामस्थांना जास्तीत जास्त या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

दिल्ली जन जाती मंत्रालयाकडून आलेले प्रतिनिधी मुकेशकुमार यादव यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी केले तर स्वागत आणि आभार हे दामू वाघे, कृष्णा वाघे, मोतीराम वाघे, अंकुश वाघे, कान्हा वाघे, गुरुदास वाघे यांनी केले.

# खारघरमध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध स्पर्धा

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेचा वारस जपत नाहीत. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याचे उपेक्षितासाठी केलेले योगदान याविषयावर हि स्पर्धा बुधवारी (दि. ३)आयोजित करण्यात आली होती.

सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. विदयार्थ्यांमध्ये भाषण कौशल्य विकसित व्हावे आणि थोर मोठयांचे जीवन आणि कार्यांची प्रेरणा त्यांच्यात संस्कारीत व्हावे या हेतने या स्पर्धेचे आयोजन केले होते. शाळेमध्ये या निमित्ताने वेशभुषा आयोजित केल्या होत्या. शाळेतील मुलींनी क्रांतीज्योती




सावित्रीबाई फुलेची वेशभूषा परिधान करून स्पर्धेत भाग घेतला.

या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा कपोते यांनी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेंच्या जीवन आणि कार्यांविषयी आपले विचार मांडले. २१व्या शतकामध्ये सुध्दा क्राती ज्योती सावित्रीबाई फुले ह्या मार्गदर्शनिय आहेत. प्रतिकुल परिस्थितीमध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेंनी केलेले कार्य सर्व भारतीयांना प्रेरणादायी असल्याचे कपोते यांनी सांगितले.

# वाढदिवसानिमित्त स्वखर्चातून उभारली निवारा शेड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तुपगाव ग्रामपंचायतीचे प्रथम लोक नियुक्त सरपंच रवींद्र कुंभार यांच्या वाढदिवसानिमित्त तुपगांव येथे हिराबाई फाउंडेशनच्या माध्यमातून कै. शकुंतला लक्ष्मण कुंभार यांच्या स्मरणार्थ दशक्रिया विधीसाठी निवारा शेड स्व:खर्चातून रवींद्र कुंभार यांच्या माध्यमातून उभारण्यात येत आहे.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे बहुसंख्य कार्यकर्ते मित्रपरिवार व विविध पक्षाचे राजकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक सामाजिक, क्षेत्रातील सर्व मान्यवर उपस्थित होते. गावामधील अनेक विकास कामांना सरपंच रवींद्र कुंभार नेहमी सातत्याने सहकार्य करत असतात. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सर्वांना सोबत घेऊन लोकहिताचे कार्य करत असतात. उरण विधानसभेचे कार्य सम्राट आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून सरपंच कुंभार यांनी तुपगांव ग्रामपंचायतीमध्ये अनेक विकास कामे केली असून अनेक विकास कामे प्रगतीपथावर आहेत.

तुपगाव व आसपासच्या परिसरातील नागरिकांना दशक्रिया विधीसाठी बाहेरगावी न जाता ध्यानेश्वर शिवमंदीराच्या आवारात करता याव्यात यासाठी निवारा शेड उभारण्याच्या कामाचे भुमिपुजन सरपंच रवींद्र कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.

# विद्यावर्धिनी संस्थेच्या शाळा, महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विद्यावर्धिनी संस्था गुरुवर्य बाळाराम पाटील प्राथमिक विद्यालय माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज दारावे, नेरूळ यांच्या वतीने शालेय वार्षिक स्नेहसंमेलन २०२३-२४चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्या वर्धिनी संस्थेचे अध्यक्ष व भाजपचे माजी नगरसेवक सुनील पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचसोबत पोलीस खात्यात कार्यरत नम्रता ओव्हाळ या शाळेच्या माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

प्रारंभी, सुनील पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी विद्यावर्धिनी संस्थेचे खजिनदार विकास पाटील, माजी नगरसेविका सरस्वती सुनील पाटील, समाजसेविका मीना पाटील, विलास नाईक, सत्यवान पाटील, नामदेव पाटील, अंकुश भोईर, अनंत नाईक रामचंद्र नाईक, महादेव सोनार, बनसोडे, बर्वे, गायकवाड शरद पाटील, भालचंद्र भोईर, ज्ञानेश्वर पाटील, पंढरीनाथ भोईर आदी उपस्थित होते.

या वेळी शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने पारंपारिक नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वार्षिक संमेलनाला शाळेतील विद्यार्थी पालक आणि शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# सीबीएससी शाळेच्या इमारतीचा लवकरच विस्तार

**नवी मुंबई : बातमीदार**

सेक्टर ५० येथील सीबीएसई शाळा इमारतीला तळमजला अधिक सहा मजले वाढवण्याची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या इमारतीचा लवकरच विस्तार होऊन वर्ग खोल्यांची क्षमता वाढणार आहे. याबाबत माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी पालिकेकडे सातत्याने मागणी केली होती. त्यास यश आले आहे.

आमदार गणेश नाईक यांच्या माध्यमातून सातत्याने डोळस यांनी आयुक्तांसमोर विषय मांडले होते. २०१९च्या महासभेत माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी सेक्टर ५० जुने येथील भूखंडावर शाळा इमारत बनवा अशी मागणी केली होती. ती मागणी पूर्ण होऊन शाळा उभी राहिली होती, मात्र आता या शाळेला वाढता प्रतिसाद मिळत असून त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे, मात्र वर्ग खोल्या अपुऱ्या असल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. सेक्टर ५० जुने भूखंड क्र १३ वर शिक्षण विभागाने दिलेल्या गरजेनुसार वर्ग खोल्यांच्या मागणीच्या अनुषंगाने दोन मजली इमारतीच्या बांधकामाचे काम मंजूर झाले झालेले आहे. या ठिकाणी आता बांधकाम सुरू होते, मात्र इथे मागणी व गरजेनुसार इमारत टप्प्या टप्प्यात न वाढवता एकच टप्प्यात इमारतीचा विस्तार करावा अशी मागणी डोळस यांनी लावून धरली होती.

अखेर पालिकेने ही मागणी मान्य करून या ठिकणी संपूर्ण दहावी, बारावीपर्यंत शिक्षण घेता येईल या पद्धतीने इमारत बांधली जाणार आहे. विशाल डोळस यांच्या मागणीला यश आले आहे.

# शासन आपल्या दारीचा लाभ सर्वांनाच

## गोरेगाव येथील बैठकीत आमदार भरत गोगावले यांनी दिला विश्वास

**माणगाव : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी कार्यक्रमाचा लाभ सर्व स्तरातील नागरिकांना मिळणार आहे. या कार्यक्रमामुळे शासकीय अधिकारी, कर्मचारी कामाला लागले असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगड या राजधानीत शासन आपल्या दारी कार्यक्रम घ्यावा यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांनीही आपल्या विनंतीला मान देऊन आयोजन केले आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजना दारातच नव्हे तर घराघरात पोहचणार आहेत. याचा मनस्वी आनंद आम्हाला होत असून रायगड जिल्ह्यातील ७५ हजार लाभार्थांना यांचा लाभ मिळणार असल्याचा विश्वास आमदार भरत गोगावले यांनी गोरेगाव येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना दिला.



शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या नियोजनाची बैठक गोरेगाव येथे नुकतीच बौद्ध विहार गोरेगाव येथे पार पडली. त्या वेळी आमदार भरत गोगावले यांनी कार्यकर्त्यांना मागर्दर्शन केले. या वेळी युवासेना कोकण विभाग प्रदेश सचिव विकास गोगावले, दक्षिण रायगड संपर्क प्रमुख अरुण चाळके, सहसंपर्क प्रमुख चंद्रकांत कळंबे, दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, युवसेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, उपजिल्हा प्रमुख विजय सावंत, दक्षिण रायगड जिल्हा महिला संघटिका नीलिमा घोसाळकर, उपजिल्हा प्रमुख डॉ. मुकादम यांच्यासह दक्षिण रायगड जिल्ह्यातील सर्व तालुकाप्रमुख, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार भरत गोगावले यांनी, महाड विधानसभा मतदार संघातील लाभार्थ्यांव्यतिरिक्त २० हजार कार्यकर्ते येतील असे सांगितले. शासन आपल्या दारी या कार्यक्रमाला विरोधकांनी आव्हान दिल्याने शिवसैनिकातून तीव्र भावना या बैठकीत उमटल्या. हा कार्यक्रम कसा कोण रोखतो. याचा समाचार प्रत्येक शिवसैनिक घेईल अशी चर्चा या बैठकीत बोलताना व्यक्त केली.

---

## निवडक

### ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती




**कर्जत** : राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्ष रंजना धुळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ३) कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी गणेगाव येथील संगीता पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. दीपप्रज्वलन प्रतिभा लोहकरे यांच्या हस्ते करण्यात आले. शहर युवती अध्यक्ष युक्ता भोपतराव, नगरसेविका भारती पालकर, अंकिता मोरे, दिपाली पिंगळे, कांता कडू, विमल देशमुख, रूपाली लोहकरे, प्रतिभा लोहकरे, प्रियंका लोहकरे, कोमल लोहकरे, वंदना शिंदे, दीपा कदम, लक्ष्मी शिंगटे, संजीवनी देशमुख, कल्पना देशमुख, आरती दीक्षित, स्मिता घुडे, उर्मिला विचारे, जयश्री विचारे, कुसुम विचारे, मीरा विचारे, पूजा विचारे, वेदिका शिंदे, जागृती पालकर, वासंती पालकर, रूपाली पालकर, संगीता आसवले, सुलभा कारोटे, अनिता लांघे, सुनंदा कराले,सुलभा कारोटे अंकिता जगताप, संगीता पाटील, जयश्री पाटील, मनीषा देशमुख, वंदना हजारे आदी उपस्थित होत्या.

### सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**म्हसळा** : केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती बुधवारी (दि. ३) साजरी करण्यात आली. या वेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन महीला व बालकल्याण विभागाच्या पर्यवेक्षिका रेणुका पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष संजय खांबेटे, खजिनदार सुनील उमरोटकर, हिंदू समाजाचे अध्यक्ष महादेवराव पाटील, तालुका कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे, वरिष्ठ लिपिक विनोद सोनवणे, कृषी पर्यवेक्षक सुजय कुसाळकर, धनंजय सरनाईक, अशोक सानप, गणेश देवडे, रामेश्वर मगर, ग्रंथालयाचे लिपिक सायली योगुले, प्राची मेंदाडकर, पर्यवेक्षिका दिपाली पालवे, रुपेश कांबळे उपस्थित होते. या वेळी पुस्तक प्रदर्शन ठेवण्यात आले होते.



---

## पोलादपूरात व्हिव्हिपॅट मशीनद्वारे जनजागृती



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात व्हिव्हिपॅट मशीनद्वारे मतदारांमध्ये जनजागृती सुरू झाली असून तहसीलदार कपिल घोरपडे यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. ३) सकाळी शुभारंभ करण्यात आला.

मतदारांमध्ये इव्हीएम म्हणजेच इलेक्ट्रॉनिक्स व्होटींग मशीनबाबत अनेक गैरसमज पसरविण्यात आले आहेत. इव्हिएमच्या सत्यतेबाबतही साशंकता घेतली जात असल्याने निवडणूक आयोगाने मतदान केल्यानंतरची पोचपावती देण्यासाठी व्हिव्हिपॅट मशीन जोडून खात्री पटविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तालुक्यात या निवडणूक यंत्रणेच्या सत्यतेबाबत जनजागृती करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या जनजागृतीच्या रथाला जीओ टॅग करण्यात आल्यामुळे ज्या गावामध्ये जनजागृती त्या गावात हा रथ पोहचला आहे अथवा नाही याबाबत प्रशासनाची खात्री पटणार आहे, अशी माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

या वेळी निवडणूक शाखेचे कर्मचारी, पोलादपूर तहसिल कार्यालयामधील स्टाफ व तलाठी आणि सेतूचे कर्मचारी उपस्थित होते.

---

## 'खालापुरात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान यशस्वी करणार'

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान सुरू होत असून ते यशस्वी करण्यासाठी सर्वांनी मेहनत करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमोळे यांनी केले आहे.

राज्यातील शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी, स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात सर्व प्राथमिक शाळांमध्ये अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात येत असून, १५ फेब्रुवारीपर्यंत हे अभियान सुरू राहणार असल्याची माहिती खालापूर तालुका गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमोळे यांनी दिली.

या अभियानासाठी शाळांची अशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशी विभागणी करण्यात आली आहे. प्राथमिकपासून राज्यस्तरापर्यंत प्रत्येक स्तरातील विजेते या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येणार आहेत. तालुका, जिल्हा तसेच विभागीय पारितोषिके दिली जाणार आहेत.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या विद्यार्थीकेंद्रित अभियानाचा कालावधी ४५ दिवसांचा आहे. आरोग्य आर्थिक आणि कौशल्य विकासावर यातून भर दिला जाणार आहे. भौतिक सुविधा पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व अन्य अभियान उपक्रमातून राबविले जाणार आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करणे, अध्ययन-अध्यापन आणि प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देणे, शिक्षणासाठी पर्यावरणपूरक आणि आनंददायी वातावरण निर्मिती करणे, क्रीडा, आरोग्य वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अभियान राबविले जात आहे.

---

## शिरसे गावातील गणेशघाट बांधकामाचा शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील शिरसे ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांसाठी उल्हास नदीवर गणेशघाट बांधला जाणार आहे. १२ लाख रुपये खर्चून गणेश विसर्जन घाट बांधला जाणार असून या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिरसे येथे उल्हास नदीवर गणेश विसर्जन घाट बांधण्यात यावा अशी मागणी शिवसेना उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी केली होती. त्यांच्या मागणीनुसार आमदार महेंद्र थोरवे यांनी १२ लाखांचा निधी मंजूर केला होता. या निधीमधून बांधण्यात येणाऱ्या श्री गणेश विसर्जन घाटाचे कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आले. त्या वेळी संतोष भोईर, सरपंच आरती भोईर, युवा सेनेचे सचिव संदीप भोईर, उपसरपंच रवींद्र भोईर, सदस्य शोभा पवार, गीता देशमुख, कल्पना गायकवाड, माजी उप सरपंच मनीषा दळवी, माजी सदस्य विजय देशमुख तसेच मुकुंद पवार, सदा पवार, कोंडू वारे, दीपक कदम, कृष्णा पवार आदी उपस्थित होते.

---

## मुंबई-पुणे महामार्गावर पुलाचा कठडा धोकादायक

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई -पुणे जुन्या महामार्गावर खालापूर हद्दीत वावंढळवाडी गावानजीक पुलाचा अर्धा फूट उंचीचा संरक्षक कठडा अपघाताला निमंत्रण देत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अधिपत्याखाली आणि आयआरबीकडे देखभाल दुरुस्तीसाठी जुना मुंबई-पुणे महामार्ग सोपवण्यात आला आहे. पनवेलहून खोपोलीच्या दिशेने जाताना आसरे ते वावंढळवाडी गावादरम्यान वावंढळ नदीवर २० फूट उंचीचा पूल आहे. पुलाचा एका बाजूला जेमतेम अर्धा फूट उंचीचा कठडा शिल्लक आहे.



याठिकाणी रस्त्याला वळण आणि उतार असून लगेच पूल असल्याने वाहन वेगात असतात. या अगोदर या पुलावरून एसटी नदीत कोसळून जीवघेणा अपघात घडला असल्याने अपघाताचे सावट कायम आहे. त्यामुळे पुलाच्या कठड्याची उंची वाढविण्याची मागणी होत आहे.

---

## आजपासून रायगड कृषी महोत्सव

**रायगड** : जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत५ ते ७ जानेवारीदरम्यान रायगड जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. ५)सर्पमित्र प्रशांत सुतार, बांबू लागवडीबाबत आनंद पत्की, आंबा पीक संरक्षणाबाबत जीवन आरेकर यांचे व्याख्यान, शनिवारी (दि. ६) शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व कार्यपद्धती हेमंत जगदाप, कांदा व मसाले पीक व्यवस्थापक व प्रक्रिया डॉ. जितेंद्र कदम, सामुहिक शेती नाथाराव कराड, भातलागवड तंत्रज्ञान व सुधारीत जाती डॉ. भरत वाघमोडे, सेंद्रीय शेती डॉ. संदीप कांबळे, रविवारी (दि. ७) सेंद्रीय शेती माधुरी देशपांडे, वन्यप्राणी व पशुंपासून पिकांचे संरक्षण अविनाश साळुंखे, आपत्ती व्यवस्थापन जयपाल पाटील, कृषी विभाग योजना उपविभागीय कृषि अधिकारी आनंद कांबळे यांचे व्याख्यान व समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

---

## हुतात्म्यांचे विचार आत्मसात करावेत -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याला क्रांतिकारकांचा इतिहास आहे. या तालुक्यातील दोन क्रांतिकारकांनी आपल्या रक्ताचा अभिषेक देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी घातला आहे. त्यामुळे त्यांचे नाव सर्वांसाठी स्फूर्ती देणारे असते. हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचे स्मरण राहावे म्हणून हुतात्मा स्मारक समिती कार्य करीत असून युवा पिढीने क्रांतिकारकांचे विचार आत्मसात करावे, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



माथेरान येथील क्रांतिकारक भाई कोतवाल आणि मानिवली येथील क्रांतिकारक हिराजी पाटील यांना २ जानेवारी १९४३ रोजी सिद्धगड येथे हौतात्म्य प्राप्त झाले. या दोन्ही हुतात्म्यांचा बलिदान दिन नेरळ येथील हुतात्मा चौक येथे हुतात्मा स्मारक समितीतर्फे आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी आमदार सुरेश लाड, कृषी भूषण शेखर भडसावळे, स्वातंत्र्यसैनिकांचे नातेवाईक शरद भगत, नेरळ सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, नेरळ सहायक निरीक्षक शिवाजी ढवळे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, ग्रामपंचायत सदस्य गीतांजली देशमुख, शिवाली पोतदार, जयश्री मानकामे, श्रद्धा कराळे, तसेच नम्रता कांदळगावकर आदी उपस्थित होते.

सुरुवातीला हुतात्म्यांचे पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन आमदार थोरवे आणि माजी आमदार लाड यांनी केले, तर मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन आणि मशाल पूजन करण्यात आले. स्मारक समितीचे चंद्रकांत काळे आणि केदार खडे यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी तर सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले. मान्यवरांचे स्वागत स्मारक समितीचे दर्वेश पालकर यांनी केले.या कार्यक्रमात जगातील सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करणारे गिर्यारोहक संतोष दगडे यांना हुतात्मा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. निवृत्त जवान कुमार जाधव आणि निवृत्ती नीलधे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

नेरळ हुतात्मा चौक ते मुरबाड तालुक्यातील सिद्धगड असा प्रवास सायकलवरून करणारा १० वर्षीय हिरेन राम हिसालगे याचाही विशेष सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

---


## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय-०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/विद्युत/नि.सु./पी.ए.सिस्टीम/१४११/२०२३-२०२४, दिनांक - ०४-०१-२०२४

### जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या विद्युत विभागास खालील नमूद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | रोहा शहरामधील प्रमुख चौकांमध्ये P.A. (Public Address) साऊन्ड सिस्टीम पुरवठा करणे बसविणे व कार्यान्वित करुन देणे. | 10000 | 1000 | कामाचे आदेश दिलेपासून ९० दिवस. |

**निविदा अटी/शर्ती :-**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०५-०१-२०२४ पासून १५-०१-२०२४ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.

२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक ०५-०१-२०२४ पासून १५-०१-२०२४ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.

३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटा एका मोठ्या लखोट्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक ०५-०१-२०२४ पासून १५-०१-२०२४ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.

४) जी.एस.टी. (वस्तु व सेवा कर) कराचा पडणाऱ्या भाराचा विचार करूनच निविदेतील दर सर्व कर्रासहित असावेत. बिलाची आकारणी केलेनंतर कर अतिरिक्त अनुज्ञेय राहणार नाहीत

५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा सखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक १५-०१-२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल

६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.

८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयात विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

शिक्का

सही/-
(पंकज भुसे)
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद

# भारताचा ऐतिहासिक विजय

## दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सिराज-बुमराहची शानदार गोलंदाजी

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना केपटाऊनमध्ये पार पडला आहे. या सामन्यात भारताने आफ्रिकेवर सात विकेट्सनी ऐतिहासिक विजय नोंदवला. केपटाऊनमध्ये टीम इंडिया पहिली आशियाई टीम आहे, जिने आफ्रिकेला हरवले आहे. त्याचबरोबर दोन सामन्यांची कसोटी मालिका १-१ ने बरोबरीत सोडवली. भारताच्या या विजयात वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराहने महत्त्वाची भूमिका बजावली. भारताने ३१ वर्षांच्या इतिहासात प्रथमच केपटाऊनमध्ये कसोटी सामना जिंकला आहे.



या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायला उतरलेल्या दक्षिण आफ्रिका संघाचा पहिला डाव ५५ धावांवर आटोपला. त्यानंतर प्रत्युत्तरात टीम इंडियाने पहिल्या डावात १५३ धावा केल्या ९८ धावांची आघाडी घेतली. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १७६ धावांत गारद झाला. अशाप्रकारे टीम इंडियाला विजयासाठी ७९ धावांचे लक्ष्य मिळाले होते, जे टीम इंडियाने १२ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले.

दुसऱ्या डावात रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल यांनी भारताला दमदार सुरुवात करून दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४४ धावांची भागीदारी केली. यशस्वीच्या रूपाने भारताला पहिला धक्का बसला. तो २३ चेंडूत २८ धावा करून बाद झाला. त्याने सहा चौकार मारले. आंद्रे बर्गरच्या चेंडूवर तो ट्रिस्टन स्टब्सकरवी झेलबाद झाला. भारताला दुसरा धक्का शुबमन गिलच्या रूपाने बसला. तो ११ चेंडूत १० धावा करून बाद झाला. कागिसो रबाडाने त्याला क्लीन बोल्ड केले. शुबमनने आपल्या खेळीत दोन चौकार मारले. विराट कोहली बाद होणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरला. तो ११ चेंडूत १२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. मार्को यान्सनच्या गोलंदाजीवर यष्टिरक्षक काइल वेरेयनने झेल घेतला. रोहित शर्मा १७ आणि श्रेयस अय्यर ४ धावा काढून नाबाद परतले.

### १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा

# रायगडचा दक्षिण विभागावर दणदणीत विजय



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या आमंत्रित १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत रायगडाने आपली विजयी घोडदौड सुरूच ठेवली आहे. चौथ्या सामन्यात रायगड संघाने दक्षिण विभाग संघाचा एक डाव ७८ धावांनी पराभव केला. या सामन्यात अथर्व पाटील याने दोन्ही डावात मिळून नऊ आणि पंकज इटकर यांनी आठ बळी मिळवले.

दक्षिण विभाग संघाने प्रथम फलंदाजी करताना ३४ षटकांत सर्व गडी गमावून ६५ धावा केल्या. रायगडच्या गोलंदाजीसमोर एकही फलंदाज तग धरू शकला नाही. रायगडच्या अथर्व पाटील १५ धावांत ६ बळी तर पंकज ईटकर १२ धावा देऊन ४ बळी घेतले.

आशीर्व पाटील (८३ धावा), पार्थ पवार (३७ धावा), मंत्रा पाटील (३० धावा) आणि पंकज ईटकर (२९ धावा) यांच्या फलंदाजीच्या जोरावर रायगडने पाहिल्या डावात २३४ धावा करून दक्षिण विभागावर १६९ धावांची आघाडी घेतली. पंकज इटकर व अथर्व पाटील यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे दक्षिण विभागाचा दुसरा डाव ९१ धावांवर आटोपला. रायगड संघाने हा सामना एक डाव आणि ७८ धावांनी जिंकला.

दक्षिण विभगाच्या दुसऱ्या डावात पंकज इटकरने २७ धावा ४ बळी आणि अथर्व पाटील यांनी ३३ धावा ३ बळी घेतले. अथर्व पाटीलने दोन्ही डावात मिळून ९ आणि पंकज इटकर यांनी ८ बळी घेतले.

# अश्वरोहणात ऐश्वर्या थैलला तीन सुवर्णपदक

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य अश्वरोहण संघटना आणि नंदुरबार जिल्हा संघटनेच्या वतीने नंदुरबारमधील सारंगखेडा यात्रेतील चेतक फेस्टिव्हलमध्ये झालेल्या राज्यस्तरीय अश्वरोहण स्पर्धेत पुण्याच्या ऐश्वर्या थैलने तीन सुवर्णपदकांची कमाई केली.

ऐश्वर्या थैलने १२ ते १४ वर्षे मुलींच्या गटात सहभागी होताना ड्रेसेज, हॅक्स, शो जंपिंग नॉर्मल या प्रकारात अव्वल क्रमांक पटकावला. याचबरोबर तिने पोल बेंडिंगमध्ये ब्राँझ पदकाचीही कमाई केली. ऐश्वर्या थैल सेंट मेरीज स्कूलमध्ये आठवी इयत्तेत शिकते. ती पुण्यातील दिग्विजय हॉर्स रायडिंग क्लबमध्ये सराव करीत आहे.



ऐश्वर्या थैलने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्येच सरावाला सुरवात केली. त्यामुळे तिच्यासाठी ही स्पर्धा म्हणजे मोठे आव्हान होते, मात्र मार्गदर्शक गुणेश पुरंदरे, प्रशिक्षक स्वप्नील साने, अनिकेत वाघोडे यांच्या साथीने तिने हे आव्हान यशस्वीपणे पार पाडले. तिने चारही प्रकारांत आपले कौशल्य दाखवून उपस्थितांची आणि पंचांची मने जिंकली.




# तटकरे तंत्रनिकेतन येथे वर्चस्व क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड गोवे येथील गीता. द. तटकरे तंत्रनिकेत व आयटीआय येथे गुरुवारी (दि. ४) संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे यांच्या हस्ते वर्चस्व २०२४ क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे, सचिव प्रकाश सरकले रजिस्ट्रार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल, आयटीआयचे प्राचार्य संजय हजारे, एमडीएन फ्यूचर स्कूलचे देवेंद्र चांदगांवकर, मुख्याध्यापिका योगिनी देशमुख, मुख्याध्यापक इंगळे, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी कॉलेजचे प्राचार्य देशमुख, अमोल गोळीपकर, तसेच तटकरे ग्रुप ऑफ इंस्टिट्यूटचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

प्रथम दीपप्रज्वलन करून त्यानंतर ज्योत प्रज्वलित करण्यात आली. मागील शैक्षणिक वर्षात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या राज्यातील वेशभूषा करून भारतीय संस्कृतीचे सादरीकरण केले.

संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे, रजिस्ट्रार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वर्चस्व क्रीडा स्पर्धेत टेक्नीकल इव्हेंट, आउटडोअर खेळामध्ये क्रिकेट, कबड्डी, खो-खो, धावणे, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, बॅडमिंटन स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धा ४ ते १३ जानेवारी या कालावधीत होणार आहे.

# स्टंपिंग आणि कंक्शनच्या नियमात बदल

**नवी दिल्ली** : नवीन वर्षाच्या मुहूर्तावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) खेळाच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत. या बदलांनंतर, खेळाडू नियमांचा वापर करून अयोग्य फायदा घेऊ शकणार नाहीत. स्टंपिंगबाबत आयसीसीने सर्वात मोठा नियम बदलला आहे. यासंबंधीचे रिव्ह्यू आता फक्त साइड-ऑन कॅमेरे पाहूनच घेतले जातील. याचा अर्थ स्टंपिंगबाबतचे अपिल जेव्हा थर्ड अंपायरपर्यंत पोहचते, तेव्हा ते चेंडू बॅटला लागला की नाही हे पाहणार नाहीत. ते फक्त स्टंपिंगबाबतच निर्णय देतील.

आयसीसीच्या नवीन दुरूस्तीमध्ये असे म्हटले आहे की, नवीन नियम स्टंपिंगचे रिव्ह्यू केवळ स्टंपिंगच्या तपासणीपुरते मर्यादित करते. त्यामुळे क्षेत्ररक्षण संघाला रिव्ह्यूदरम्यान इतर कोणत्याही पद्धतीने फलंदाज बाद आहे का नाही तपासणीसाठी मोफत रिव्ह्यू मिळणार नाहीत. आयसीसीने कन्कशन रिप्लेसमेंट नियमांमध्येही अधिक स्पष्टता आणली आहे. दुखापत झालेल्या खेळाडूला गोलंदाजी करण्यापासून निलंबित केले असल्यास, त्याच्या बदली खेळाडूला गोलंदाजी करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
















सौजन्य : अनेष ढवळे, (पळस्पे विभागीय अध्यक्ष),
कु.रोशन शांताराम पोपटा (ग्रुप ग्रामपंचायत उमरोली, उपसरपंच)



सौजन्य : जितेंद्र घरत (अध्यक्ष, भारतीय जनरल कामगार संघटना व भाजप रायगड जिल्हा कामगार आघाडी)



सौजन्य : शोभा सातपुते


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com